भैरवनाथ एज्युकेशन सोसायटी
केडगाव देवी
संस्थापक: श्री भानुदासजी कोतकर



संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा



रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने १२ (६+६) | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, सोमवार दि. ११.०५.२०२६ | अंक नं. ०३४ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020




## केडगावमध्ये शिक्षणाची गंगा आणणारे भगीरथ



**मा. श्री. भानुदासजी कोतकर साहेब**
संस्थापक / अध्यक्ष, भैरवनाथ एज्युकेशन सोसायटी,
केडगाव देवी, अहिल्यानगर.

### इयत्ता १० वी गुणवंत विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचा सत्कार समारंभ



















**इ. १० व १२ वीच्या परिक्षेमध्ये उज्ज्वल यश संपादन केल्याबद्दल सर्व विद्यार्थी, पालक, मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे हार्दिक अभिनंदन!**

**सौ. सुरेखाताई भानुदासजी कोतकर** — अध्यक्षा
**रघुनाथ भाऊराव लोंढे** — ज्येष्ठ संचालक
**सचिन (आबा) भानुदासजी कोतकर** — सचिव

**सर्व संचालक मंडळ, भैरवनाथ एज्युकेशन सोसायटी, केडगाव देवी**

चला स्विमिंग ला...
स्विमिंग सुट, गॉगल, स्विमिंग कॅप, बरमुडा स्विमिंग लेगींग्ज टॉप, व बरेच काही
जरीवाला
कापड बाजार, फोन नं. 7666510765
यशोदानगर, पाईपलाईन रोड,
सिंहगड रोड, त्रिमुर्ती हॉस्पिटल जवळ, योगेश मेडीकल शेजारी, पुणे. मो. 7775089505

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

नगरकरांसाठी समर प्लॅन
फक्त ₹550* मध्ये
FRIENDS & FAMILY साठी PERFECT प्लॅन
PACKAGE INCLUDES
Adventure Games / Swimming Pool
Rain Dance / Turf & Fun Activities
आवश्यक सुचना –
१) पूर्व बुकिंग आवश्यक
२) स्विमिंग कॉस्ट्यूम आवश्यक
३) मॅनेजमेंटचे सर्व निर्णय अंतिम असतील
रोज पिकअप व ड्रॉप सुविधा
ठिकाण : आनंदधाम येथुन
बुकिंगसाठी संपर्क: 6262-90-6262 | व्हिंटेज हिल्स, टाँड रोड, अहिल्यानगर

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने १२ (६+६) | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, सोमवार दि. ११.०५.२०२६ | अंक नं. ०३४ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020

स्वप्नवत ऑफर... स्वप्नवत सफर...
१०१ भाग्यवंत जोडप्यांना चक्क FREE हनिमून टूर
1 डिसेंबर 2025 ते 31 मे 2026
बस्ता बांधायला यायचं हं!
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अहिल्यानगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

22 कॅरेट सोन्याचा
सर्वात कमी भाव, सर्वात कमी मजुरी..
दागिन्यांची प्रतीग्रॅम मजुरी ₹ १९९/-*
2014 पासून आपल्या सेवेत..
सोनेरी नातं..
चंदुकाका ज्वेल्स
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02

# अहिल्यानगरमध्ये उष्णतेचा कडाका

## अतिनील किरणांचा धोका वाढला; धूलिकणांचे प्रमाण वाढल्याने हवेचा दर्जाही खालावला

नगर – गेल्या काही दिवसांपासून अहिल्यानगर शहरात तापमानाचा पारा सातत्याने वाढत असून, उष्णतेच्या लाटेसोबतच अतिनील किरणांचा धोकाही वाढला आहे. अतिनील किरणांचा निर्देशांक ११.३ या धोकादायक पातळीवर पोहोचला आहे, जो सर्वसाधारण ५ पर्यंत असायला हवा.

दरम्यान शहरातील हवेच्या गुणवत्तेतही बदल होत असल्याचे दिसून येत आहे. वायू गुणवत्ता निर्देशांकांच्या ताज्या आकडेवारीनुसार, शहराचा सरासरी वायू गुणवत्ता निर्देशांक ७४ मायक्रोग्राम प्रति घनमीटर इतका नोंदवण्यात आला असून, तो मध्यम श्रेणीत मोडत असला तरी हवेतील धूलिकणांचे वाढलेले प्रमाण चिंताजनक आहे.

शहरात सध्या कडक ऊन पडत असून कमाल तापमान ३९ अंशापर्यंत पोहोचले आहे. विशेष म्हणजे हवेतील आर्द्रतेचे प्रमाण कमालीचे घटून केवळ १२ टक्केवर आले आहे. यामुळे हवेत कोरडेपणा वाढला असून नागरिकांना प्रचंड उकाड्याचा सामना करावा लागत आहे. वाऱ्याचा वेग ताशी १८.७ किलोमीटर असून, असून अतिनील किरणांचा निर्देशांक ११.३ या धोकादायक पातळीवर पोहोचला आहे. दुपारच्या वेळी घराबाहेर पडणाऱ्या नागरिकांनी त्वचेची काळजी घेण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

अहिल्यानगरमधील हवेच्या गुणवत्तेत प्रामुख्याने धुलिकणांचे प्रमाण वाढलेले आहे. यामुळे डोळ्यांची जळजळ, घशात खवखव जाणवू शकते. धुलिकणांचे प्रमाण कायम राहिल्यास श्वसनाचे विकार जडण्याची शक्यता आहे. सध्या वाढलेल्या धुलिकणांमुळेच शहरातील वायू प्रदूषण वाढल्याचे वायू गुणवत्ता निर्देशांकाच्या ताज्या आकडेवारीवरुन समोर आले आहे. तसेच कार्बन मोनोऑक्साइड, सल्फर डायऑक्साइड आणि ओझोनचे प्रमाणही वाढले आहे. हवेचा दर्जा मध्यम श्रेणीत असल्याने फुफ्फुसाचे आजार असलेल्या व्यक्ती, वृद्ध आणि लहान मुलांना श्वसनाचा त्रास जाणवू शकतो. हवेतील कोरडेपणा आणि वाढलेले धूलिकण यामुळे डोळे जळजळणे किंवा घसा खवखवणे यांसारख्या समस्या उद्भवू शकतात.

नागरिकांनी दुपारच्या वेळी (१२ ते ४) शक्यतो कडक उन्हात बाहेर पडणे टाळावे, बाहेर पडताना सनग्लासेस, टोपी आणि छत्रीचा वापर करावा, शरीरातील पाण्याचे प्रमाण टिकवून ठेवण्यासाठी जास्तीत जास्त पाणी प्यावे, श्वसनाचा त्रास असणाऱ्यांनी धुळीच्या ठिकाणी मास्कचा वापर करावा, वाढत्या तापमानामुळे आणि धूलिकणांमुळे नागरिकांनी आपल्या आरोग्याची विशेष काळजी घ्यावी, असा सल्ला तज्ज्ञांनी दिला आहे.

## दोन लाखांच्या सौर पॅनलची चोरी

नगर – शेतातील सौर ऊर्जेवर चालणाऱ्या पंपाचे सुमारे १ लाख ९० हजार रुपयांचे साहित्य अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याची घटना नगर तालुक्यातील चिचोंडी पाटील गावाच्या शिवारात घडली आहे. या प्रकरणी नगर तालुका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत शहीद हुसेन शहानिजाम सय्यद यांनी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी यांचे चिचोंडी पाटील शिवारातील गट क्रमांक ७७/१ मध्ये शेत आहे. या शेतात त्यांनी सिंचनासाठी सौर पॅनल आणि पंप बसवले होते. ८ मे च्या सायंकाळी ७ ते ९ मे च्या सकाळी १० वाजेच्या दरम्यान, अज्ञात चोरट्याने शेतात प्रवेश केला.

चोरट्यांनी दीड लाख रुपये किंमतीचे सौर पंपाचे १३ पॅनल, ३० हजार रुपयांचा कंट्रोलर आणि १० हजार रुपयांचे तांब्याचे अर्थिंग रॉड असा १ लाख ९० हजार रुपयांचा माल चोरून नेला. सकाळी शेतात गेल्यावर हा प्रकार उघडकीस आला. या प्रकरणी अहिल्यानगर तालुका पोलीस ठाण्यात चोरट्याविरुद्ध चोरीचा गुन्हा नोंदवण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार भवार करत आहेत.

## नगर शहरात होतोयं मातीमिश्रीत दूषित पाणीपुरवठा; काही ठिकाणी आढळले सुक्ष्म किटक; आरोग्य धोक्यात



महापालिकेकडून गंज बाजार, सराफ बाजार परिसरात नळाला दूषित पाणी येत आहे. (छाया – धनेश कटारिया)

नगर – महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागातील व्हॉल्वमनच्या अरेरावीचे प्रकरण ताजे असतानाच आता शहरात दूषित पाणीपुरवठ्यावरुन नागरिकांमध्ये संताप दिसून येत आहे. शहरातील गंज बाजार आणि सराफ बाजार परिसरातील मातीमिश्रीत पाणीपुरवठा होत असल्याचे तसेच काही नागरिकांना नळाद्वारे आलेल्या पाण्यात अळ्या आढळून आल्याचा गंभीर आरोप होत आहे. तसेच याकडे महापालिकेचा पाणीपुरवठा विभाग जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचा आरोप रहिवाशांनी केला आहे.

गंज बाजार आणि सराफ बाजार हा अत्यंत गजबजलेला परिसर आहे. येथील नळांना येणारे पिण्याचे पाणी अतिशय घाण आणि दुर्गंधीयुक्त असून, त्यात अळ्या सदृश्य सुक्ष्म कीटक आढळून येत आहेत. हे दूषित पाणी प्यायल्यामुळे नागरिकांच्या आरोग्यावर त्याचे विपरीत परिणाम होण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. या पाण्यामुळे अतिसार (डायरिया), कॉलरा, टायफॉइड आणि कावीळ यांसारख्या जलजन्य आजारांची साथ पसरण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

दूषित पाण्यातील विषाणू आणि हानिकारक रासायनिक घटकांमुळे केवळ पोटदुखी किंवा उलट्याच होतात असे नाही, तर यामुळे पचनसंस्थेचे गंभीर विकार जडतात. विशेषतः कॉलरासारख्या आजारात शरीरातील पाणी झपाट्याने कमी होऊन निर्जलीकरण झाल्यामुळे मृत्यू ओढवण्याचीही भीती असते. लहान मुले आणि वृद्धांच्या बाबतीत ही समस्या अधिक जीवघेणी ठरू शकते, असे या परिसरातील नागरिकांनी सांगितले.

एकीकडे महापालिका कर वसूल करण्यात तत्परता दाखवत असताना, दुसरीकडे किमान स्वच्छ पाणी पुरवण्यात अपयशी ठरत असल्याची टीका नागरिक करत आहेत. काही दिवसांपूर्वीच पाणी सोडण्यावरुन व्हॉल्वमनने अरेरावी केल्याचे समोर आले होते. त्यामुळे महापालिकेच्या बैठकीत नगरसेवकांनी अधिकाऱ्यांना धारेवर धरले होते. तर आता शहरात अशुद्ध पाणीपुरवठा होत असल्यामुळे पाणीपुरवठा विभागाचा कारभार पुन्हा चव्हाट्यावर आला आहे. आम्ही दूषित पाणी पिऊन मरण्याची वाट महापालिका प्रशासन पाहत आहे का? असा संतप्त सवाल सराफ बाजारातील व्यापाऱ्यांनी आणि रहिवाशांनी उपस्थित केला आहे. पाणीपुरवठा केंद्रातील गाळण प्रक्रिया व्यवस्थित होत नसल्याने किंवा जलवाहिनीमध्ये कुठेतरी सांडपाणी मिसळत असल्यानेच हा प्रकार घडत असल्याची चर्चा नागरिकांमध्ये आहे.

अहिल्यानगर महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाने आपली गाफील वृत्ती सोडून द्यावी आणि या समस्येचे मूळ शोधून काढण्यासाठी युद्धपातळीवर काम करावे, जोपर्यंत जलवाहिनीची दुरुस्ती आणि स्वच्छता होत नाही, तोपर्यंत पर्यायी टँकरद्वारे स्वच्छ पाण्याचा पुरवठा करावा, अशी विनंतीही नागरिकांनी प्रशासनाकडे केली आहे.

## जागतिक ल्युपस दिन (Make Lupus Visible)

सिस्टिमिक ल्युपस एरिथेमॅटोसस (SLE) हा एक दीर्घकालीन ऑटोइम्यून आजार आहे. सोप्या भाषेत सांगायचे तर, जेव्हा शरीराची रोगप्रतिकारक शक्ती चुकून स्वतःच्याच निरोगी पेशी आणि ऊतींवर (tissues) हल्ला करते, तेव्हा हा आजार होतो. यामुळे शरीराच्या विविध भागांत सूज आणि वेदना जाणवू शकतात.

प्रमुख लक्षणे :
ल्युपसची लक्षणे व्यक्तीनुसार बदलू शकतात, पण सामान्यतः खालील गोष्टी दिसून येतात:
• अति थकवा : विश्रांती घेऊनही न जाणारा थकवा.
• सांधेदुखी : सांध्यांमध्ये सूज आणि कडकपणा जाणवणे.
• चेहऱ्यावर पुरळ : नाकावर आणि गालावर फुलपाखराच्या आकाराचे (Butterfly Rash) लाल पुरळ येणे.
• ताप : कोणत्याही कारणाशिवाय वारंवार सौम्य ताप येणे.
• सूर्यप्रकाशाची ॲलर्जी : उन्हात गेल्यावर त्वचेवर पुरळ येणे किंवा त्रास वाढणे.
• केस गळणे : मोठ्या प्रमाणात केस गळणे.

हा आजार कोणाला होऊ शकतो?
• हा आजार संसर्गजन्य नाही (एकाकडून दुसऱ्याकडे पसरत नाही).
• हा प्रामुख्याने १५ ते ४५ वयोगटातील स्त्रियांमध्ये जास्त प्रमाणात आढळतो.
• अनुवंशिकता आणि पर्यावरणातील बदल (उदा. अतिनील किरण, ताणतणाव) ही याची कारणे असू शकतात.

निदान आणि उपचार
• निदान: ल्युपस ओळखण्यासाठी तज्ज्ञ डॉक्टर (Rheumatologist) रक्ताच्या चाचण्या (उदा. ANA Test) आणि शारीरिक तपासणी करतात.
• उपचार: हा आजार पूर्णपणे बरा होत नसला, तरी योग्य औषधोपचार आणि जीवनशैलीतील बदलांमुळे रुग्ण सामान्य आयुष्य जगू शकतात.
• काळजी: उन्हापासून संरक्षण करणे, संतुलित आहार घेणे आणि वेळेवर औषधे घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे.



डॉ. विद्या अभिजीत सांगळे (बांगर)
(कन्सल्टंट ह्रमॅटॉलॉजिस्ट व रुमेटोलॉजिस्ट)

न्यूरोसायकियाट्रिक ल्युपस
ज्याला एनपीएसएलई (NPSLE) म्हणून ओळखले जाते, ही ल्युपसची एक गुंतागुंत आहे.

ल्युपस- ज्यामध्ये शरीराची रोगप्रतिकारक शक्ती चुकून स्वतःच्याच पेशींवर हल्ला करते. एनपीएसएलईमध्ये, हा हल्ला मेंदू आणि उर्वरित मज्जासंस्थेवर होतो, ज्यामुळे अनेक प्रकारच्या चेतासंस्थेशी संबंधित (neurological) आणि मानसिक समस्या उद्भवू शकतात.

हे समजून घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे की ल्युपस हा केवळ सांधे किंवा त्वचेचा आजार नाही. जरी ही लक्षणे सामान्य असली, तरी एनपीएसएलई हे स्पष्ट करते की या आजाराचा थेट परिणाम विचारक्षमतेवर (cognitive function - विचार करण्याची, समजून घेण्याची क्षमता) आणि मानसिक आरोग्यावर होऊ शकतो. याची लक्षणे अनेकदा सूक्ष्म असतात आणि त्यांच्याकडे सहज दुर्लक्ष केले जाऊ शकते किंवा इतर आजारांची लक्षणे म्हणून समजली जाऊ शकतात, ज्यामुळे चुकीचे निदान होऊ शकते. ल्युपसचा मानसिक आरोग्यावर परिणाम होण्याचा हा अनेक मार्गांपैकी एक मार्ग आहे.

निश्चित निदान करण्यापूर्वी या लक्षणांच्या इतर संभाव्य कारणांना, विशेषतः संसर्गांना (infections), नेहमी वगळले पाहिजे. एनपीएसएलईच्या प्रभावी व्यवस्थापनासाठी (management) लवकर ओळखणे आणि वेळेवर, अचूक निदान करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. हाय-डोस स्टेरॉइड्स, इंट्राव्हेनस इम्युनोग्लोब्युलिन (IVIG) आणि रितुक्सिमॅब (rituximab) यांसारखे उपचार सुरुवातीच्या टप्प्यात दिल्यास अनेकदा चांगले परिणाम (positive prognosis) मिळतात.

जर तुम्हाला खालीलपैकी कोणतीही लक्षणे जाणवत असतील, विशेषतः जर तुम्हाला आधीच ल्युपसचे निदान झाले असेल, तर तुम्ही त्वरित सखोल तपासणीसाठी डॉक्टरांचा सल्ला घ्यावा :
• स्मृती कमी होणे किंवा एकाग्रता आणि समस्या सोडवण्यात अडचणी येणे (cognitive dysfunction)
• भावनिक अवस्थेत अनपेक्षित बदल यांसारखे सततचे मूड बदल
• उदासीनतेची लक्षणे, जसे की सतत दुःख वाटणे, कामातील रस कमी होणे आणि थकवा
• झोपेच्या गंभीर समस्या, ज्यात झोप लागण्यास किंवा ती टिकवून ठेवण्यास अडचण येणे समाविष्ट आहे
• सायकोसिस (Psychosis ), ज्यामध्ये वास्तवाशी संपर्क तुटतो आणि भास किंवा भ्रम होऊ शकतात.

ल्युपस नेफ्रायटिसची (Lupus Nephritis)
"ल्युपस" (autoimmune) आजार शरीराच्या किडनीवर हल्ला करतो. यामुळे किडनीला सूज येते आणि उपचार न केल्यास किडनीवर कायमस्वरूपी जखमा किंवा किडनी निकामी होऊ शकते.

सामान्य लक्षणे:
किडनीमध्ये वेदना ओळखणाऱ्या संवेदना नसतात, त्यामुळे होणारे नुकसान कदाचित तुम्हाला लगेच जाणवणार नाही. सुरुवातीच्या लक्षणांमध्ये खालील गोष्टींचा समावेश होतो:
• फेसाळ लघवी: किडनीतून प्रथिने (protein) गळती होत असल्याने हे लक्षण आहे.
• सूज (Edema): सहसा पाय, घोटा किंवा पाऊलांवर सूज येते; कधीकधी चेहरा किंवा हातावरही सूज दिसू शकते.
• उच्च रक्तदाब.
• लघवीतून रक्त येणे: लघवीचा रंग गडद किंवा गुलाबी दिसू शकतो.

निदान आणि तपासणी
डॉक्टर किडनीच्या आरोग्यावर लक्ष ठेवण्यासाठी तीन मुख्य साधनांचा वापर करतात:
१. लघवीची चाचणी (Urine Test): लघवीतील प्रथिने आणि रक्ताचे प्रमाण तपासण्यासाठी.
२. रक्त चाचणी (Blood Test): "क्रिएटीनाइन" (creatinine) मोजण्यासाठी. जर किडनी नीट काम करत नसेल, तर हे टाकाऊ द्रव्य शरीरात साठू लागते.
३. किडनी बायोप्सी (Kidney Biopsy): जळजळ/सूज नेमकी कोणत्या प्रकारची आणि किती गंभीर आहे हे ठरवण्यासाठी ही सर्वात खात्रीशीर तपासणी मानली जाते.

जीवनशैली आणि व्यवस्थापन टिप्स
ल्युपस नेफ्रायटिसचे व्यवस्थापन करण्यासाठी औषधे आणि दैनंदिन सवयींचा ताळमेळ आवश्यक आहे :
• मिठाचे प्रमाण कमी करा:
• प्रथिनांच्या (PROTEIN) प्रमाणावर लक्ष ठेवा: किडनीवरील ताण कमी करण्यासाठी तुमचे डॉक्टर तुम्हाला प्रथिनांचे (उदा. चिकन किंवा मासे) मर्यादित सेवन करण्याचा सल्ला देऊ शकतात.
• सक्रिय राहा: हृदयाचे आरोग्य आणि ऊर्जा टिकवून ठेवण्यासाठी चालणे, पोहणे किंवा योगासने यांसारख्या व्यायामाची शिफारस केली जाते.
• नियमित औषधे घ्या: हायड्रॉक्सीक्लोरोक्विन, स्टिरॉइड्स किंवा नवीन "बायोलॉजिक्स" ही औषधे रोगप्रतिकारक शक्ती शांत करण्यासाठी आणि किडनीचे संरक्षण करण्यासाठी अत्यंत महत्त्वाची आहेत.
• लवकर निदान होणे हीच यशाची गुरुकिल्ली आहे. जर तुम्हाला ल्युपस असेल आणि नवीन सूज किंवा लघवीमध्ये बदल जाणवत असतील, तर त्वरित संधिवात तज्ज्ञांशी संपर्क साधा.
• २०२६ पर्यंत उपलब्ध झालेल्या नवीन पर्यायांसह आधुनिक उपचार, लवकर सुरू केल्यास किडनी निकामी होण्यापासून रोखण्यासाठी अत्यंत प्रभावी आहेत.
• डॉ. विद्या अभिजित सांगळे (बांगर) यांच्या मते, एनपीएसएलईच्या व ल्युपस नेफ्रायटिस या निदानांसाठी अत्यंत काळजीपूर्वक दृष्टिकोन आवश्यक आहे.

advt

पत्ता – माऊली संधीवात क्लिनीक (MARC) शाम अपार्टमेंट, गायकवाड कॉलनी, गॅलक्सी आणि मॅक केयर हॉस्पिटलशेजारी, झोपडी कँटीनच्या मागे, सावेडी, अहिल्यानगर-414003. फोन 7028652070

SONI TILES Since 1965
AND MARBLE INDUSTRIES
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar.
Tel. : (0241) 2418720
Mob. 9372497999
Wholesalers & Manufacturers of Ceramic Wall & Floor Tiles, Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स अँण्ड मार्बल इंडस्ट्रिज

सस्नेह निमंत्रण
|| श्री गणेशाय नमः ||   || महावीराय नमः ||
सादर प्रणाम
avisthic
elevating your financial horizons
ॲविओथिक सर्व्हिसेस एलएलपी
हमारे इस नूतन ऑफिस का
स्थलांतर एवं उद्घाटन समारोह
मंगलवार, 12 मई 2026, शाम 4.00 बजे



प.पू. स्वामी गोविंददेव गिरीजी महाराज
कोषाध्यक्ष - श्रीराम जन्मभूमि न्यास, अयोध्या
उपाध्यक्ष - श्रीकृष्ण जन्मभूमि न्यास, मथुरा
इनके शुभ करकमलोद्वारा होने जा रहा है
इस मंगल अवसरपर आपकी उपस्थिती प्रार्थनीय है |
विनीत
गणेश श्रीनिवास झंवर | प्रितेश मदनलाल दुगड
समस्त झंवर एवं दुगड परिवार
समय
मंगलवार,12 मई 2026, शाम 4 से 10 बजे तक
स्थान
403, व्यंकटेश प्राईम, आनंदधाम के सामने,
यश पॅलेस-कोठी रोड, अहिल्यानगर - 414 001.

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
# नवा मराठा
फोन–२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# सावेडी उपनगरात युवक-युवतीला कोयत्याचा धाक दाखवून लुटले

नगर– सावेडी भागात एका युवतीला आणि तिच्या मित्राला अडवून कोयत्याचा धाक दाखवत लुटल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. चोरट्यांनी मारहाण करत युवतीच्या मोबाईलमधील ऑनलाईन पेमेंट वरून ३० हजार रुपये स्वतःच्या खात्यावर वळवून घेतले, तर खिशातील ५ हजार रुपये रोख काढून घेतले.

सदरची घटना ५ मे रोजी आठरे पाटील शाळेच्या पुढे रोडवर आणि शाळेच्या पाठीमागे घडली असून गुन्हा ९ मे रोजी दाखल झाला आहे. गोविंदपूरा भागात राहणार्या पीडित २४ वर्षीय युवतीने फिर्याद दिली आहे. याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महेश बाबासाहेब आरू, जॉय सोनवणे (पूर्ण नाव पत्ता माहिती नाही) आणि त्यांच्या दोन साथीदारांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पीडित युवती तिच्या मित्रासोबत दुचाकीवरून इव्हेंटचे पैसे आणण्यासाठी एका शिक्षकांकडे जात असताना आठरे पाटील शाळेजवळ संशयित आरोपींनी त्यांना थांबवले.

महेश आरू, जॉय सोनवणे आणि त्यांच्या दोन साथीदारांनी दुचाकीची चावी काढून घेतली आणि कंबरेचा कोयता काढून युवतीला मारहाण केली. संशयित आरोपींनी दोघांचे मोबाईल हिसकावून घेत पासवर्ड विचारले आणि युवतीशी गैरवर्तन केले. त्यानंतर आरोपींनी युवतीच्या खात्यावरून ३० हजार रुपये चोरले आणि दुचाकीतील ५ हजार रुपये रोख काढून घेतले. कोणालाही माहिती दिल्यास जीवे मारण्याची धमकी देऊन चोरटे पसार झाले. पीडित युवतीने दिलेल्या फिर्यादीवरून पोलिसांनी गुन्हा नोंद केला असून अधिक तपास महिला सहाय्यक पोलीस निरीक्षक कल्पना चव्हाण करीत आहेत.

# ट्रॅव्हलमध्ये महिलेवर केलेल्या छेडछाडी अत्याचाराविरोधात नगरमध्ये ‘सकल हिंदू समाजा’चा ‘मोर्चा व रास्ता रोको’

## ट्रॅव्हल जिहाद प्रवृत्तीचा निषेध



तारकपूर बस स्टँड परिसरात एसटी बसमध्ये केलेल्या अश्लील वर्तनाच्या घटनेविरोधात कायनेटीक चौकात रास्तारोको आंदोलनात बोलताना आ. संग्राम जगताप.

नगर – शहरातील तारकपूर बस स्टँड परिसरात एसटी बसमध्ये एका तरुणीसोबत अश्लील वर्तनाची घटना समोर आली असून, त्या घटनेचा सीसीटीव्ही व्हिडीओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाला. त्यानंतर सकल हिंदू समाजात संतापाची लाट उसळली. सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेमध्ये हिंदू महिलांसोबत घडणाऱ्या अश्लील आणि गैरवर्तनाच्या घटनांमुळे नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. या घटनेच्या निषेधार्थ ११ मे रोजी आ. संग्राम जगताप यांच्या नेतृत्वाखाली सकल हिंदू समाजाच्यावतीने रास्तारोको आंदोलन करण्यात आले. यावेळी ट्रॅव्हल जिहाद प्रवृत्तीचा निषेध असो अशा घोषणांनी परिसर दुमदुमून गेला होता.

बस स्थानक चौकातील छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन या आंदोलनास सुरुवात करण्यात आली. येथे सर्व आंदोलक मोर्चाद्वारे कायनेटिक चौक येथे पोहोचले. तेथे सर्व आंदोलकांनी रस्त्यावरच ठाण मांडून रास्तारोको आंदोलन सुरु केले. या आंदोलनामुळे काही काळ वाहतूक विस्कळीत झाली होती. यावेळी महापौर ज्योती गाडे, भाजपा शहर जिल्हध्यक्ष अनिल मोहिते यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस व भाजपा युतीचे सर्व नगरसेवक व नगरसेविका, महिला पदाधिकारी व विविध हिंदुत्ववादी संघटनांचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

याबाबत सकल हिंदू समाजाने पोलीस अधीक्षकांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, तारपूर बस स्टँड परिसरात एसटी बसमध्ये एका तरुणीसोबत अश्लील वर्तनाची घटना घडली आहे. केवळ सरकारी बसच नव्हे, तर जुना माळीवाडा स्टँड, स्वस्तिक स्टँड आणि इतर खासगी ट्रॅव्हल्स परिसरातही हिंदू महिलांची छेडछाड आणि गैरवर्तनाचे प्रकार वाढले आहेत. यामुळे महिला प्रवाशांमध्ये आणि त्यांच्या पालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

संबंधित गुन्ह्याची सखोल चौकशी करून दोषी आरोपीवर कठोर गुन्हा दाखल करून तात्काळ अटक करावी, आरोपीला तात्काळ सेवेतून बडतर्फ करावे, सर्व एसटी कर्मचारी, चालक, वाहक आणि खासगी ट्रॅव्हल्स एजंट यांची पोलीस पडताळणी अनिवार्य करावी, सर्व बसस्थानके आणि बसमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसवून त्यांचे नियमित निरीक्षण करावे, महिलांच्या सुरक्षेसाठी विशेष पोलीस गस्त आणि स्वतंत्र सुरक्षा पथक नेमावे, रात्रीच्या वेळी बसस्थानक परिसरात पुरेशी प्रकाशयोजना आणि सुरक्षा रक्षक तैनात करावेत, अशा विविध मागण्या आंदोलकांनी केल्या.

यावेळी बोलताना आ. संग्राम जगताप म्हणाले, नगरमध्येच नव्हे तर राज्यभर हा ट्रॅव्हल जिहादचा प्रकार वाढत आहे. जिहादी वृतींकडून असे वेगवेगळ्या जिहादचे प्रकार वाढत आहेत. हिंदू महिलांनी आत जागरूक झाले पाहिजे. ज्या बस, रिक्षा व गाडीने महिला प्रवास करत असतील त्या गाड्यांचे ड्रायव्हर व कंडक्टर हे हिंदू आहेत की नाही याची खात्री करूनच त्या गाडीने प्रवास करा. या आधीही ज्या घटना घडल्या त्याविरोधात कडक कारवीची मागणी शासनाकडे केली आहे. प्रवासावेळी हिंदू महिलांच्या छेडछेडीचे अनेक प्रकार समोर येत आहेत. हा नूरचा एक व्हिडीओ समोर आला आहे. परंतु असे समोर न आलेले अनेकजण आहेत. त्याविरोधात आम्ही आज हिंदू समाज म्हणून रास्ता रोको आंदोलन केले. पुढील काळात अशा घटना घडू नये आणि लोकांमध्ये जागृकता निर्माण व्हावी यासाठी हे आंदोलन केले आहे, असे संग्राम जगताप यांनी सांगितले.

# आठवड्याच्या पहिल्याच दिवशी भारतीय शेअर बाजार कोसळला

## सेन्सेक्स १००० हून अधिक अंकांनी घसरला तर निफ्टीत ही ३०० हून अधिक अंकांची घसरण

मुंबई – पश्चिम आशियातील शांततेच्या आशांना बसलेल्या धक्क्याचा परिणाम आज देशांतर्गत शेअर बाजारावरही दिसून आला. सुरुवातीच्या व्यवहारात बीएसई (मुंबई शेअर मार्केट) सेन्सेक्स १००० हून अधिक अंकांनी घसरला, तर नॅशनल स्टॉक एक्सचेंजचा निफ्टी निर्देशांक ३०० हून अधिक अंकांनी खाली आला.

आठवड्याच्या पहिल्या व्यापार दिवशी, सोमवार, ११ मे रोजी बाजार उघडताच भारतीय शेअर बाजार कोसळला. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणचा शांतता प्रस्ताव फेटाळल्यानंतर जागतिक बाजार हादरला, ज्याचा थेट परिणाम भारतीय बाजारावरही दिसून आला. कच्च्या तेलाच्या वाढत्या किमती आणि मध्य-पूर्वेतील वाढत्या तणावामुळे बाजारातील वातावरण पूर्णपणे बिघडले.

निफ्टी ऑटो, निफ्टी फायनान्शियल सर्व्हिसेस, निफ्टी मीडिया, मेटल्स, फार्मा, पीएसयू बँक्स आणि इतर सर्व क्षेत्रांमध्ये विक्री होताना दिसत आहे. सोमवारी सकाळी ९.४० वाजता मुंबई शेअर बाजार १०४५.४५ अंक म्हणजे १.३५% घसरून ७६,२८२.७४ वर आला तर, निफ्टी निर्देशांकही २८८.३० अंकांनी किंवा १.१९% घसरणीसह २३,८८७.८५ वर खाली आला. त्याचवेळी, भारतीय रुपया देखील डॉलरच्या तुलनेत ०.४% घसरला आणि ९४.८८ वर उघडला.

### गुंतवणूकदारांचे झटक्यात लाखो कोटींचे नुकसान

या घसरणीमुळे बीएसई सूचीबद्ध कंपन्यांचे बाजार भांडवल सुमारे ६ लाख कोटी रुपयांनी घसरून ४६७ लाख कोटी रुपयांवर आले. सेन्सेक्समध्ये सूचिबद्ध ३० पैकी २८ शेअर्समध्ये घसरणीचाच दबाव दिसत असून यामध्ये सर्वाधिक टायटनचा शेअर ५.१२ टक्क्यांनी आपटला. याशिवाय इंडिगो, महिंद्रा अँड महिंद्रा, एसबीआय, इटरनल, मारुती, भारती एअरटेल, लार्सन अँड टुब्रो, बजाज फिनसर्व्ह, अल्ट्राटेक सिमेंट आणि अदानी पोर्ट्स यांचे शेअर्सदेखील १ टक्क्यांहून अधिक घसरले. दुसरीकडे, एचसीएल टेकचा शेअर किंचित वाढला, तर सन फार्माचा शेअर सपाट उघडला.

### मोदींच्या आवाहनानंतर ज्वेलरी स्टॉक्स घसरले

त्याचवेळी, बाजारातील घसरणीत ज्वेलरी आणि एव्हिएशन स्टॉक्सनी हातभार लावला. टायटन, सेन्को गोल्ड आणि इतर ज्वेलरी कंपन्यांच्या शेअर्समध्ये घसरण दिसून येताना अनेक सोन्याच्या कंपन्यांचे शेअर्स जवळपास ९% घसरले. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी लोकांना सोन्याची खरेदी आणि परदेश प्रवास टाळण्याचे आवाहन केल्यानंतर या शेअर्समध्ये पडझड झाली.

याशिवाय सकाळी सुरुवातीच्या व्यवहारात इंटरग्लोब एव्हीएशनचे शेअर्स ४ टक्क्यांहून अधिक घसरले. पंतप्रधानांनी लोकांना इंधनाचा वापर कमी करण्याचे, अनावश्यक परदेश प्रवास टाळण्याचे आणि देशांतर्गत खर्चाला प्राधान्य देण्याचे आवाहन केल्यानंतर इंडिगोच्या मूळ कंपनीच्या शेअर्सवर दबाव आला.

# १६ मे रोजी शिबीर संयोजक गौरव पुरस्कार सोहळा

नगर – जनकल्याण रक्तकेंद्राच्या वतीने दरवर्षी रक्तदान शिबीर आयोजित करणाऱ्या संयोजकांचा गौरव पुरस्कार सोहळा आयोजित केला जात असतो. अथक प्रयत्न करुन या सर्व मंडळींनी रक्तदान शिबीरे आयोजित करुन रुग्णसेवेत बहुमोल कामगिरी केली आहे. त्या प्रित्यर्थ १६ मे रोजी स. १०.३० ते १ यावेळेत हॉटेल यश ग्रँड, स्टेशन रोड, अहिल्यानगर येथे या सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमास शिबीर संयोजकांनी उपस्थित रहावे असे आवाहन रक्तकेंद्राचे अध्यक्ष, कार्यवाह व संचालक मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

# इन्स्टाग्रामच्या पोस्टवरील वादातून दोन भावांवर केला प्राणघातक हल्ला

## नालेगावच्या कवडे गल्लीतील घटना, दोघांवर खुनाच्या प्रयत्नाचा गुन्हा दाखल

नगर – नालेगाव भागात कवडेगल्ली येथे जुन्या वादातून दोन सख्ख्या भावांवर चॉपर आणि चाकूने जीवघेणा हल्ला झाल्याची घटना घडली आहे. इन्स्टाग्रामवरील पोस्ट मुळे उद्भवलेल्या वादाचे रूपांतर हाणामारीत झाले असून, यामध्ये अभिषेक शाम टोणे आणि कुबेर टोणे (दोघे रा. कवडे गल्ली, नालेगाव) हे दोन भाऊ गंभीर जखमी झाले आहेत.

सदरची घटना ६ मे रोजी सायंकाळी ७ ते ८ वाजण्याच्या सुमारास घडली आहे. अभिषेक टोणे हे घराबाहेर असताना चिदंबर शिंदे आणि नटराज शिंदे (दोघे रा. सांगळे गल्ली) हे तिथे आले. आरोपी चिदंबरच्या हातात चॉपर तर नटराजकडे चाकू होता. जुन्या वादाचा राग मनात धरून त्यांनी कुबेर टोणे याच्या डोक्यात आणि हातावर वार केले. त्याला वाचवण्यासाठी धावलेल्या अभिषेकवरही आरोपींनी हल्ला केला. नटराजने अभिषेकच्या डाव्या डोळ्यापाशी वार केला, तर चिदंबरने कानाच्या मागे चॉपरने मारून गंभीर जखमी केले. जखमींच्या आईने आरडाओरडा केल्यानंतर परिसरातील नागरिक मदतीला धावून आले, हे पाहून दोन्ही आरोपी घटनास्थळावरून पळून गेले. जखमी भावांना तातडीने जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे, तर एकावर खाजगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, साहाय्यक पोलीस निरीक्षक तेजस्विनी थोरात या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

# बेकायदेशीर ऑनलाईन औषध विक्रीविरोधात २० मे रोजी देशव्यापी बंद



नगर – देशभरात वाढत चाललेल्या बेकायदेशीर ऑनलाईन औषध विक्रीला विरोध करत तसेच कार्पोरेट कंपन्यांकडून निर्माण करण्यात येणाऱ्या अव्यावसायिक स्पर्धेविरोधात अखिल भारतीय औषध विक्रेता संघटनेने २० मे रोजी देशव्यापी औषध विक्रेता बंदची घोषणा केली आहे. एआयओसीडीचे अध्यक्ष जगन्नाथ स. शिंदे यांच्या नेतृत्वाखाली हा बंद पुकारण्यात आला असून, जिल्ह्यातील सर्व केमिस्ट बांधवांना या आंदोलनात सहभागी होण्याचे आवाहन जिल्हा केमिस्ट असोसिएशनचे अध्यक्ष दत्ता गाडळकर व सचिव आबासाहेब बेद्रे यांनी केले आहे.

औषध व्यवसाय हा Drugs and Cosmetics Act १९४० व Rules १९४५ अंतर्गत नियंत्रित केला जातो. मात्र, ऑनलाईन औषध विक्रीसंदर्भात या कायद्यात कोणतीही स्पष्ट तरतूद नसल्याचे संघटनेने नमूद केले आहे. केंद्र सरकारने इंटरनेटच्या माध्यमातून औषध विक्रीसंदर्भात २८ ऑगस्ट २०१८ रोजी GSR 817 (E) अंतर्गत अधिसूचना काढली होती. परंतु, त्या अधिसूचनेचे अद्याप कायद्यात रूपांतर झालेले नसतानाही देशभरात मोठ्या प्रमाणात ऑनलाईन औषध विक्री सुरू असल्याचा आरोप संघटनेकडून करण्यात आला आहे. यासंदर्भात दिल्ली उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल असून, न्यायालयाने ऑनलाईन औषध विक्रीस स्थगिती दिल्याचेही संघटनेने स्पष्ट केले. मात्र, याकडे सरकारकडून दुर्लक्ष होत असल्याचा आरोप करत एआयओसीडीने संबंधित जीएसआर अधिसूचना रद्द करण्याची मागणी केली आहे.

कोरोना काळात नागरिकांना सुविधा मिळावी यासाठी केंद्र सरकारने २६ मार्च २०२० रोजी GSR 220 (E) अंतर्गत औषधांच्या होम डिलिव्हरीस विशेष परवानगी दिली होती. मात्र, कोरोनाचा कालावधी संपून पाच वर्षे उलटूनही ही अधिसूचना रद्द करण्यात आलेली नाही. या सवलतीचा फायदा घेत ऑनलाईन कंपन्या स्वतःचे भागभांडवल वापरून मोठ्या प्रमाणावर सवलती देत औषध विक्री करत असल्याचा आरोप औषध विक्रेत्यांनी केला आहे.

संघटनेचे अध्यक्ष जगन्नाथ शिंदे यांनी सांगितले की, Drug Price Control Order २०१३ नुसार जीवनावश्यक औषधांवर होलसेलरला ८ टक्के व रिटेलरला १६ टक्के नफा निश्चित करण्यात आला आहे. तर अनियंत्रित औषधांवर होलसेलरला १० टक्के व रिटेलरला २० टक्के नफा देण्यात येतो. मात्र, कार्पोरेट कंपन्या २० ते ५० टयांपर्यंत डिस्काउंट देत असल्याने देशातील सुमारे १२.५० लाख औषध विक्रेत्यांचा व्यवसाय धोक्यात आला आहे.

या पार्श्वभूमीवर सरकारने DPCO 2013 अंतर्गत असलेली नियंत्रित नफ्याची तरतूद मागे घ्यावी, तसेच डॉक्टरांनी लिहून दिलेल्या औषधांच्या पर्यायी ब्रँड सबस्टिट्यूट औषध विक्रीचा अधिकार केमिस्टना द्यावा, अशी मागणीही संघटनेने केली आहे. त्यामुळे औषध विक्रेते स्पर्धात्मक वातावरणात सक्षमपणे टिकू शकतील, असे शिंदे यांनी नमूद केले. सरकारच्या विविध मंत्रालयांना, संबंधित अधिकाऱ्यांना तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनाही वारंवार निवेदने देऊन सकारात्मक निर्णयाची मागणी करण्यात आली. मात्र, त्याला प्रतिसाद न मिळाल्याने आंदोलनात्मक भूमिका घ्यावी लागल्याचे एआयओसीडीने स्पष्ट केले.

जिल्हाध्यक्ष दत्ता गाडळकर यांनी सांगितले की, महाराष्ट्रात हा बंद शंभर टक्के यशस्वी करण्यासाठी सर्व सभासद सज्ज आहेत. अहिल्यानगर जिल्ह्यातही या बंदला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळणार असून, सरकारकडून सकारात्मक प्रतिसाद न मिळाल्यामुळे औषध विक्रेत्यांमध्ये तीव्र नाराजी असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

## निनाकुमारी नय्यर यांचे अल्प आजाराने निधन



नगर – नय्यर हाऊस यशवंत कॉलनी येथील रहिवासी श्रीमती निनाकुमारी प्रेमभुषण नय्यर (वय ७८) यांचे १० मे रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे १ मुलगा, ५ मुली, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे. गौरव नय्यर यांच्या त्या मातोश्री होत.

## शशिकांत त्रिभूवन यांचे हृदयविकाराने निधन



नगर – अहमदनगर पहिली मंडळी (सी एन आय) चे ज्येष्ठ सभासद, मंडळींचे माजी सेक्रेटरी, स्टेट बँक ऑफ इंडियाचे माजी व्यवस्थापक शशिकांत त्रिभुवन ऊर्फ बच्चू त्रिभुवन (वय ८०, रा. गुलाबसिंग कंपाऊंड कोठी रोड) यांचे ११ मे रोजी हृदयविकाराने निधन झाले. त्यांचा दफनविधी लालटाकी येथील ख्रिश्चन स्मशानभूमी येथे करण्यात आला.

त्यांच्या पश्चात पत्नी, १ मुलगा, १ मुलगी, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे. विकी त्रिभूवन यांचे ते वडील होत.

## बाळासाहेब रोटे यांचे अल्प आजाराने निधन



श्रीरामपूर – येथील स्वस्तिक मशिनरीचे मालक बाळासाहेब बाबुराव रोटे (वय ७४) यांचे अल्प आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात एक भाऊ, तीन मुले, सुना, पुतणे, नातवंडे असा परिवार आहे. बबनराव रोटे यांचे धाकटे बंधू, सागर, अजित व समीर रोटे यांचे वडील, रितेश (आबा), अमोल व गणेश रोटे यांचे चुलते होत.

# अष्टविनायकातील मोरगाव, थेऊर व सिद्धटेक येथील मंदिरे ९ जूनपर्यंत भाविकांसाठी बंद

पुणे – अष्टविनायक विकास आराखड्याअंतर्गत तसेच पुरातत्त्व विभागाच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या जतन, संवर्धन व दुरुस्ती कामांच्या पार्श्वभूमीवर श्री मयुरेश्वर मंदिर, श्री चिंतामणी मंदिर आणि श्री सिद्धिविनायक मंदिर ही मंदिरे ९ जून पर्यंत भाविकांच्या दर्शनासाठी पूर्णपणे बंद ठेवण्यात येणार असल्याची माहिती पुरातत्त्व विभागाकडून देण्यात आली आहे.

अष्टविनायकातील मंदिरांचे जतन, देखभाल व दुरुस्ती करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने विशेष निधी उपलब्ध करून दिला असून, या कामांसाठी चिंचवड देवस्थान ट्रस्टतर्फे शासनाचे आभार मानण्यात आले आहेत. सध्या मोरगाव, थेऊर आणि सिद्धटेक येथे मुख्य मंदिर तसेच मंदिर परिसरातील जतन, संवर्धन आणि दुरुस्तीची कामे प्रगतीपथावर आहेत.

पुरातत्त्व विभागाच्या नियोजनानुसार मंदिरांचा मुख्य गाभारा आणि सभामंडप यांचे पौराणिक स्वरूप जपत सुबक दगडी बांधकामाद्वारे संवर्धन करण्यात येणार आहे. या कामादरम्यान भाविकांची मोठ्या प्रमाणातील उपस्थिती कामात अडथळा निर्माण करू शकते तसेच कामाचा कालावधी वाढण्याची शक्यता असल्याने मंदिरे तात्पुरती बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

यासंदर्भात पुरातत्त्व विभागाच्या संचालकांनी सह धर्मादाय आयुक्त, पुणे विभाग यांच्याकडे विनंती अर्ज सादर केला होता. त्यानंतर पुरातत्त्व विभाग, मंदिर प्रशासन, पुजारी वर्ग आणि ग्रामस्थ यांचे म्हणणे ऐकून घेत सह धर्मादाय आयुक्तांनी ७ मे रोजी मंदिरे तात्पुरती बंद ठेवण्याचे आदेश दिले आहेत.

सह धर्मादाय आयुक्तांच्या सूचनेनुसार चिंचवड देवस्थान ट्रस्टच्या विश्वस्त मंडळानेही मोरगाव, थेऊर आणि सिद्धटेक येथील मंदिरे भाविकांसाठी बंद ठेवण्याचा ठराव मंजूर केला आहे. तसेच ८ मे रोजी संबंधित ठिकाणी ग्रामस्थांच्या उपस्थितीत ग्रामसभा घेऊन मंदिर बंद ठेवण्याबाबत माहिती देण्यात आली.

या कालावधीत मंदिरांमध्ये नित्य पूजाअर्चा व धार्मिक विधी नियमितपणे सुरू राहतील. मात्र भाविकांना मंदिर परिसरात प्रवेश किंवा प्रत्यक्ष दर्शनाची सुविधा उपलब्ध राहणार नाही. मंदिरांचे पुजारी, बांधकाम यंत्रणा, अधिकृत अधिकारी, कर्मचारी आणि विश्वस्त यांच्याशिवाय अन्य कोणालाही प्रवेश दिला जाणार नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

ही विकासकामे मंदिरांची दीर्घकालीन सुरक्षितता, सुविधा आणि भाविकांच्या सोयीसाठी अत्यंत आवश्यक असून ती नियोजनबद्ध व वेळेत पूर्ण व्हावीत यासाठी नागरिकांनी आणि भाविकांनी मंदिर संस्थान, जिल्हा प्रशासन, पोलीस प्रशासन व स्थानिक प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# घरभाड्याचे पैसे मागितल्याने घर मालकावर चाकू हल्ला

नगर – आगरकर मळा भागात घरभाड्याचे पैसे मागितल्याच्या कारणावरून एका भाडेकरूने घरमालकावर हल्ला केल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, मुळचे राजस्थान येथील बनवारी मोहन माळी हे अहिल्यानगर शहरातील आगरकर मळा येथील बेलेश्वर कॉलनीमध्ये वास्तव्यास आहेत. संशयित आरोपी सुरेश कुमार राधेशाम माळी हा त्यांच्याकडे भाड्याने राहत होता.

७ मे रोजी सकाळी बनवारी माळी यांनी संशयित आरोपीकडे थकीत भाड्याच्या पैशांची मागणी केली. आधी भाड्याचे पैसे दे, मगच तुझे सामान घेऊन जा, असे त्यांनी आरोपीला बजावले. या साध्या कारणावरून आरोपीचा पारा चढला आणि त्याने शिवीगाळ केली. दोघांमधील वाद विकोपाला गेल्यावर आरोपीने बनवारी यांची गचांडी धरून त्यांना हाताने मारहाण केली.

यावेळी स्वतःचा बचाव करण्यासाठी फिर्यादीने आरोपीला बाजूला ढकलले असता, रागाच्या भरात असलेल्या आरोपीने आपल्याजवळील चाकू काढून थेट फिर्यादीवर वार केला. या हल्ल्यात फिर्यादी गंभीर जखमी झाले असून त्यांना तातडीने जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. कोतवाली पोलिसांनी याप्रकरणी ९ मे रोजी गुन्हा नोंदवला आहे.

# जिल्हा नियोजन समितीची बैठक १५ मे रोजी; पालकमंत्री डॉ. विखे पाटील करणार आढावा

नगर – अहिल्यानगर जिल्ह्याच्या विकासकामांच्या नियोजनासाठी आणि विविध योजनांच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्यासाठी महत्त्वाची असलेल्या जिल्हा नियोजन समितीची बैठक १५ मे रोजी आयोजित करण्यात आली आहे.

राज्याचे जलसंपदा तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक पार पडणार आहे. जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन सभागृहात दुपारी ३ वाजता ही बैठक संपन्न होईल, अशी माहिती जिल्हा नियोजन अधिकारी दीपक दातीर यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे. या बैठकीत प्रामुख्याने जिल्ह्यासाठी मंजूर करण्यात आलेल्या वार्षिक योजनांचा निधी, झालेला खर्च आणि नवीन विकासकामांच्या प्रस्तावांना मंजुरी देण्याबाबत चर्चा होऊन निर्णय होण्याची शक्यता आहे. विशेषतः ग्रामीण भागातील रस्ते, आरोग्य सुविधा आणि पाणीपुरवठ्याच्या योजनांवर या बैठकीत भर दिला जाण्याची शक्यता आहे. या बैठकीला जिल्ह्यातील सर्व खासदार, आमदार, जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच विविध विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित राहणार आहेत.

# ॲलेक्स कप फुटबॉल स्पर्धेत गुलमोहर एफसी विजयी




नगर – भुईकोट किल्ला येथील मैदानावर आयोजित ॲलेक्स कप फुटबॉल स्पर्धेच्या अंतिम सामन्यात गुलमोहर एफसीने फिरोदिया शिवाजियन्स युनायटेड एफसीवर २–० असा विजय मिळवत विजेतेपद पटकावले. गुलमोहर एफसीकडून पार्थ मस्कर याने दोन्ही गोल करत संघाच्या विजयात मोलाची भूमिका बजावली. स्पर्धेच्या पारितोषिक वितरण समारंभासाठी अहमदनगर डिस्ट्रिक्ट फुटबॉल असोसिएशन, अहिल्यानगरचे मानद सचिव व स्व. ॲलेक्स फर्नांडिस यांचे पुत्र रोनप फर्नांडिस, फुटबॉल असोसिएशनचे उपाध्यक्ष खालिद सय्यद, संयुक्त सचिव प्रदीप जाधव, कार्यकारिणी सदस्य व्हिक्टर जोसेफ, राजू पाटोळे, पल्लवी सैंदाणे आणि झोएब खान उपस्थित होते.

स्पर्धेच्या आयोजनासाठी फिरोदिया शिवाजियन्सचे सदस्य जेव्हिअर स्वामी, सचिन पात्रे, राजेश अँथनी आणि अभिषेक सोनवणे यांनी विशेष परिश्रम घेतले. तसेच वरिष्ठ खेळाडू अभय साळवे, मयूर गोरखा, साहिल कुसळकर, तसेच उत्कर्ष सोनवणे, नील धेंडवाल, जोएल पात्रे आणि इतर खेळाडूंच्या योगदानाचे क्लबतर्फे विशेष कौतुक करण्यात आले.

विजयी व उपविजयी ठरलेल्या संघांना चषक व रोख बक्षिस देण्यात आले. यासह स्पर्धेतील वैयक्तिक पुरस्कारांमध्ये सर्वोत्कृष्ट खेळाडू: नील धेंडवाल (फिरोदिया शिवाजियन्स युनायटेड), सर्वोत्कृष्ट गोलरक्षक: उनाध्य जाधव (गुलमोहर एफसी) यांना देखील विशेष सन्मानित करण्यात आले. अंतिम सामन्याचे पंच म्हणून जोनाथन जोसेफ, सुयोग महांगडे, ऋषभ मणी आणि प्रियांका अवारे यांनी काम पाहिले.

यावेळी बोलताना रोनप फर्नांडिस यांनी खेळ म्हणजे शिस्त असून सर्व संघांनी कोणताही वाद न घालता खेळलेला खेळ हा खेळाडूंमधील शिस्तीचा उत्तम नमुना असल्याचे सांगितले.

संयुक्त सचिव प्रदीप जाधव यांनी लवकरच अहमदनगर डिस्ट्रिक्ट फुटबॉल असोसिएशनची लीग सुरू होणार असल्याची माहिती देऊन सीआरएस नोफ्लदणी करण्याचे आवाहन केले.

स्पर्धेतील विजयी, उपविजयी संघाचे प्रायोजक तसेच अहमदनगर डिस्ट्रिक्ट फुटबॉल असोसिएशनचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया आणि वरिष्ठ उपाध्यक्ष मनोज वाळवेकर यांनी अभिनंदन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पल्लवी सैंदाणे यांनी करुन आभार मानले.

अंतिम सामना – गुलमोहर एफसी विरुध्द फिरोदिया शिवाजियन्स युनायटेड एफसी यांच्यात अत्यंत चुरशीचा झाला. सामन्याच्या सुरुवातीपासूनच गुलमोहर एफसीने आक्रमक खेळी करत प्रतिस्पर्धी संघावर दबाव निर्माण केला. सामन्याच्या ७ व्या मिनिटाला पार्थ मस्कर याने गोल करत संघाला आघाडी मिळवून दिली. त्यानंतर पुन्हा एकदा आक्रमक चाली रचत १२ व्या मिनिटाला दुसरा गोल झळकावून फिरोदिया शिवाजियन्स युनायटेड एफसीसमोर मोठे आव्हान उभे केले.

दोन गोलने पिछाडीवर पडल्यानंतर फिरोदिया शिवाजियन्स संघाने पुनरागमनासाठी अनेक प्रयत्न केले. मात्र गुलमोहर एफसीच्या भक्कम बचावफळीसमोर त्यांची एकही रणनीती यशस्वी ठरली नाही. शेवटपर्यंत गोल करण्यासाठी आटोकाट प्रयत्न करूनही त्यांना खाते उघडता आले नाही. पार्थ मस्करच्या दमदार दुहेरी गोलच्या जोरावर गुलमोहर एफसीने २–० असा दणदणीत विजय मिळवत ॲलेक्स कप आपल्या नावावर केला.

# राज्यस्तरीय ॲथलॅटिक स्पर्धेत आठरे पाटील पब्लिक स्कूलच्या खेळाडूंची उत्कृष्ट कामगिरी


खुद्दस् रेहान


कु. सोनवणे स्वरा

नगर – अहिल्यानगर शहराच्या सावेडी विभागातील, वडगांव–गुप्ता रोड वरील आठरे पाटील पब्लिक स्कूल या इंग्रजी माध्यमाच्या वसतिगृहात्मक शाळेच्या विद्यार्थ्यांनी नाशिक ॲथलॅटिक फाउंडेशनतर्फे आयोजित चौथ्या महाराष्ट्र राज्यस्तरीय ॲथलॅटिक्स स्पर्धेत सहभाग घेतला होता.

या स्पर्धेत शाळेचा खेळाडू कु. खुद्दस रेहान इम्रान या विद्यार्थ्याने सदर स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी केली. त्याने ६० मीटर व १०० मीटर धावण्याच्या शर्यतीत तिसरा क्रमांक प्राप्त केला. त्याबद्दल त्याला कास्य पदक व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले व पुणे येथील राष्ट्रीय स्पर्धेसाठी त्याची निवड करण्यात आली. तसेच शाळेची विद्यार्थिनी कु. सोनवणे स्वरा योगेश हिने ॲथलॅटिक्स स्पर्धेत सहभाग घेऊन चमकदार कामगिरी केली त्याबद्दल तिलाही प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. यावेळी क्रीडा शिक्षकांच्याही धावण्याच्या स्पर्धा घेण्यात आलया. या स्पर्धेत शाळेच्या क्रीडा शिक्षिका सौ. सोनवणे शितल योगेश यांनीही सहभाग घेऊन प्रमाणपत्र प्राप्त केले.

या यशस्वी खेळाडूंच्या यशाबद्दल संस्थेच्या अध्यक्षा डॉ. अंजली आठरे पाटील, कार्यकारी विश्वस्त डॉ. अनिल आठरे पाटील, सर्व विश्वस्त, मुख्याध्यापक व सर्व शिक्षकवृंद यांनी अभिनंदन केले.

या स्पर्धेसाठी शाळेचे क्रीडा शिक्षक संदिप दंरदले यांचे मार्गदर्शन लाभले.

# अहिल्यानगर प्रीमियर लीगमध्ये जी एन एस नाईट रायडर्स विजेता; सुपर ओव्हरमध्ये रंगला थरार; अहिल्यानगर सुपर किंग उपविजेता





अहिल्यानगर प्रीमियर लीगमध्ये जी एन एस नाईट रायडर्स विजेता, अहिल्यानगर सुपर किंग उपविजेता ठरला. (छाया – लहू दळवी)

नगर – अहिल्यानगर जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या मान्यतेने व एस के क्रिकेट अकॅडमीच्या वतीने आयोजित सोळा वर्षाखालील अहिल्यानगर प्रीमियर लीगच्या दुसऱ्या वर्षातील अंतिम सामना अत्यंत अटीतटीचा झाला. जी एन एस नाईट रायडर्स आणि अहिल्यानगर सुपर किंग या दोन बलाढ्य संघांमध्ये झालेल्या या लढतीत अखेर सुपर ओव्हरमध्ये जी एन एस नाईट रायडर्स संघाने बाजी मारत विजेतेपद पटकावले, तर अहिल्यानगर सुपर किंग संघाला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले.

नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करत जी एन एस नाईट रायडर्स संघाने २० षटकांत ४ बाद १९० धावांचे मोठे आव्हान उभे केले तर अहिल्यानगर सुपर किंग संघाने पाटला करत. कुशल पाटीलने अवघ्या ५९ चेंडूत १०५ धावांची तुफानी खेळी करत ८ चौकार व ६ षटकार ठोकले. त्याला राम खोमणेने ५८ धावांची साथ देत दोघांनी १६३ धावांची भक्कम भागीदारी उभी केली.

१९१ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना अहिल्यानगर सुपर किंग संघानेही लढत दिली. शेवटच्या षटकात विजयासाठी ११ धावांची गरज असताना सामन्याने रंगत घेतली. अखेरच्या दोन चेंडूत ७ धावांची गरज असताना फलंदाजाने षटकार मारत सामना बरोबरीत आणला. शेवटच्या चेंडूवर एक धाव हवी असताना मोठा फटका मारण्याच्या प्रयत्नात झेलबाद झाल्याने सामना सुपर ओव्हरमध्ये गेला.

सुपर ओव्हरमध्ये अहिल्यानगर सुपर किंग संघाची फलंदाजी पूर्णपणे कोलमडली. पहिल्याच चेंडूवर षटकाराच्या प्रयत्नात झेलबाद, तर दुसऱ्या चेंडूवर त्रिफळा उडाल्याने संघाला एकही धाव करता आली नाही. त्यामुळे जी एन एस नाईट रायडर्सला विजयासाठी केवळ एका धावाची गरज होती, जी त्यांनी दुसऱ्याच चेंडूवर चौकार मारत सहज पूर्ण केली आणि विजेतेपदावर शिक्कामोर्तब केले.

स्पर्धेनंतर पारितोषिक वितरण सोहळा नगरसेवक करण कराळे यांच्या हस्ते पार पडला. यावेळी आयोजक एस के क्रिकेट अकॅडमीचे संदीप पाटोळे, अजय कविटकर, धीरज आव्हाड, सम्राट देशमुख, वैभव कराडे, ऋषिकेश सुंबे तसेच खेळाडू, पालक, मार्गदर्शक उपस्थित होते.

वैयक्तिक कामगिरीत मॅन ऑफ द मॅच पुरस्कार प्रेम इगे याला, मॅन ऑफ द सिरीज राम खोमणे याला, बेस्ट फिल्डर ओंकार टकले, बेस्ट बॉलर कुशल पाटील, तर बेस्ट बॅट्समन प्रिन्स सिंग याला देण्यात आला. तसेच उदयोन्मुख खेळाडू म्हणून तन्मय फुले आणि कार्तिक कराडे यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी नगरसेवक करण कराळे म्हणाले की, अशा स्पर्धांच्या माध्यमातून दर्जेदार खेळाडू घडतात. एस के क्रिकेट अकॅडमी लहान वयातच खेळाडूंना योग्य व्यासपीठ उपलब्ध करून देत आहे. सेमी फायनल व फायनलसारख्या सामन्यांमधून खेळाडूंना मोठा अनुभव मिळतो. क्रिकेटमध्ये १९ वर्षांपर्यंत करिअरच्या संधी आहेत. त्यामुळे खेळाडूंनी जिद्द, चिकाटी आणि मेहनत ठेवून पुढे जावे.



अहिल्यानगर येथील लिटिल वंडर्स स्कूल व विज्डम हायस्कूल येथे श्रीमती चंद्रमौळी, श्रीमती श्री धात्री यांनी १ मे पासून प्राचार्य म्हणून पदभार स्वीकारला आहे.

# लिटिल वंडर्स स्कूल व विज्डम हायस्कूलमध्ये नवीन प्राचार्यांची नियुक्ती

नगर – जेऊर येथील लिटिल वंडर्स स्कूल व विज्डम हायस्कूल येथे श्रीमती चंद्रमौळी, श्रीमती श्री धात्री यांनी १ मे पासून प्राचार्य म्हणून पदभार स्वीकारला आहे.

श्रीमती श्री धात्री यांना शैक्षणिक व प्रशासकीय क्षेत्रातील समृद्ध अनुभव लाभलेला आहे. यापूर्वी त्यांनी नारायणा स्कूल, हैदराबाद येथे प्राचार्य म्हणून कार्य करताना शाळेच्या शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी व विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी योगदान दिले आहे. त्यांना विशेषतः इयत्ता ६ वी ते १० वी साठी JEE व NEET फाउंडेशन मार्गदर्शनाचा उत्कृष्ट अनुभव असून, स्पर्धात्मक परीक्षांसाठी विद्यार्थ्यांना योग्य दिशा देण्यात त्यांचे विशेष प्रावीण्य आहे.

या वेळी शाळेच्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्यावतीने आयोजित केलेल्या स्वागत समारंभात आपले मनोगत व्यक्त करताना श्रीमती श्री धात्री यांनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर देत शिस्त, गुणवत्तापूर्ण शिक्षण तसेच प्रत्येक विद्यार्थ्याला JEE, NEET इत्यादी स्पर्धा परीक्षांसाठी सक्षम बनविण्याची तयारी येथेच करून घेऊ व विविध उपक्रमांच्या माध्यमातून शाळेला एक नव्या उंचीवर नेण्याचा निर्धार व्यक्त केला. या कार्यक्रमासाठी शाळेचे शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, पालक तसेच नागरिक उपस्थित होते.

# न्यू आर्ट्स कॉलेजमध्ये 'फूड प्रॉडक्ट टेक्नॉलॉजी' अभ्यासक्रमासाठी प्रवेश



न्यू आर्ट्स, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेजमध्ये ११ वी 'फूड प्रॉडक्ट टेक्नॉलॉजी' अभ्यासक्रमास थेट प्रवेश सुरु झाला आहे.

नगर – जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संचलित न्यू आर्ट्स, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेजमध्ये इयत्ता ११ वी साठी 'फूड प्रॉडक्ट टेक्नॉलॉजी' या व्यावसायिक अभ्यासक्रमास थेट प्रवेश सुरू झाला आहे. ११ वी व १२ वी साठी महाराष्ट्र शासनाचा एच.एस.सी. व्होकेशनल – फूड प्रॉडक्ट टेक्नॉलॉजी हा स्वतंत्र व्यावसायिक अभ्यासक्रम आहे. महाविद्यालयात सन २००४ पासून, तर महाराष्ट्रात १९८९ पासून हा अभ्यासक्रम सुरू आहे.

या अभ्यासक्रमाची प्रवेश क्षमता २५ विद्यार्थी इतकी असून गुणवत्तेनुसार थेट प्रवेश दिला जातो. हा कोर्स पूर्ण केल्यावर विद्यार्थ्यांना हॉटेल मॅनेजमेंट, होम सायन्स, बी.बी.ए., बी.सी.ए., बी.एस्सी. इ. पदवी अभ्यासक्रमांना प्रवेश मिळतो. महाविद्यालयातील ३० ते ४० टक्के विद्यार्थी जर्मनी, अमेरिका, ऑस्ट्रेलिया, कॅनडा, कुवेत, सिंगापूर, दुबई येथे कॉन्टिनेन्टल शेफ, इंडियन शेफ, सुपरवायझर, कॅप्टन, फ्रंट ऑफिस मॅनेजर, बार इनचार्ज इ. पदांवर कार्यरत आहेत. कोर्स पूर्ण करणारी अनुश्री दिवाणे ही २०२५ मध्ये अमेरिकेतील रिसॉर्ट मध्ये कार्यरत आहे. सुरुवातीला तीला ३६ लाखांचे पॅकेज मिळाले. राजगिरे ऋषिकेश कोर्स नंतर जर्मनी येथे ड्युएल डिग्री प्रोग्राम–मध्ये डिग्री घेत असून, त्यास प्रति माह १ लाख रुपये स्टायपेंड मिळतो. शैलेश भुतडा या विद्यार्थ्याने कोर्स पूर्ण करून पेस्ट्री सेक्शनमध्ये काम केले. फ्रान्समधील पेस्ट्री कॉम्पिटिशनमध्ये भारताचे प्रतिनिधित्व करून प्रथम क्रमांकाचे बक्षीस त्याने मिळवले. ते सध्या मुंबई येथे पेस्ट्रीचे क्लासेस घेतात. मनोज कांबळे हे इंडियन आर्मीमध्ये हेड कुक या पदावर अहिल्यानगरमध्ये १० वर्षांपासून कार्यरत आहेत. वैष्णवी आडिगोपुल व जाधव 'एनराईज सयाजी' मध्ये उच्च पदावर कार्यरत आहेत. मुकुंद देशमुख यांचा बुऱ्हाणनगरला स्वतःचा व्यवसाय आहे. अनेक विद्यार्थी नगरमध्ये रेस्टॉरंट, हॉटेल व्यवसायात कार्यरत आहेत.

प्राचार्य बाळासाहेब सागडे यांनी सांगितले की, आज ८३ टक्के विद्यार्थी करिअर पैशासाठी करतात तर केवळ १७ टक्के पॅशननुसार करतात व पुढे जाऊन हेच विद्यार्थी २० वर्षात कोट्यधीश होतात. फूड टेक्नॉलॉजी क्षेत्रात पॅशन, आवड व कौशल्य असेल तर उत्तम करिअर घडू शकते. आपल्या पाल्यास खाण्याची आवड, नवीन काही करण्याची इच्छा असेल तर ११ वी फूड टेक्नॉलॉजीला प्रवेश द्यावा. माहितीसाठी संपर्क : प्रा.सौ.तांबे पी.एस. (मो.९४२३७८१४७२), प्रा.पानसरे एन.एस. (मो.७५७९०८५५३६), प्रा.आडसूळ बी.एस. (मो.९४२२०८८७६४), प्रा.साठे आर.के. (मो. ८८८८२३२४०).

# तिरळेपणा (Squint): वेळेत ओळखा, योग्य उपचार घ्या

अनेक पालकांना आपल्या मुलाच्या डोळ्यांमध्ये तिरळेपणा असल्याचे दिसते आणि प्रश्न पडतो – हे आपोआप ठीक होईल का, की उपचार आवश्यक आहेत? तिरळेपणा समजून घेतल्यास योग्य वेळी योग्य निर्णय घेता येतो.

**तिरळेपणा म्हणजे काय?**

सामान्यतः दोन्ही डोळे एकाच दिशेला पाहतात आणि एकत्र काम करतात. जेव्हा ही सरळ alignment बिघडते आणि एक डोळा आत, बाहेर, वर किंवा खाली वळतो – तेव्हा त्या स्थितीला तिरळेपणा म्हणतात.

**तिरळेपणा का होतो?**

डोळ्यांची हालचाल आणि सरळपणा हा मेंदू, मज्जातंतू (nerves) आणि डोळ्यांच्या स्नायूंच्या (muscles) संतुलनावर अवलंबून असतो.

**तिरळेपणा होण्याची कारणे :**

✻ मेंदूमधील डोळ्यांचा समतोल राखणारे केंद्र नीट काम न करणे

✻ डोळ्यांना पुरवठा करणारे मज्जातंतू नीट काम न करणे

✻ डोळ्यांचे स्नायू कमकुवत किंवा असंतुलित असणे

✻ काही वेळा फक्त चष्म्याची गरज असणे

✻ म्हणून प्रत्येक मुलाची स्वतंत्र तपासणी आवश्यक असते.

**तिरळेपणाची लक्षणे**

✻ पालकांनी खालील गोष्टीकडे लक्ष द्यावे:

✻ दोन्ही डोळे एकाच दिशेला न पाहणे

✻ मूल पाहताना मान एका बाजूला वळवते

✻ एक डोळा आत किंवा बाहेर वळलेला दिसतो

✻ डोळे सतत हलत राहतात

✻ उजेडात मूल एक डोळा मिटते

**मुलाची तपासणी कशी केली जाते?**

तपासणीमध्ये खालील गोष्टींचा समावेश असतो:

**सविस्तर माहिती :**

तिरळेपणा कधी सुरू झाला, जन्माची माहिती, एकूण आरोग्य

**दृष्टी तपासणी :**

मुलाला नीट दिसते का? चष्म्याची गरज आहे का?

**डोळ्यांची सखोल तपासणी**

कधी कधी तिरळेपणा हा मोतीबिंदू किंवा डोळ्यांचा कॅन्सर यांसारख्या गंभीर आजाराचे लक्षण असू शकतो.

**तिरळेपणाची सखोल तपासणी :**

तिरळेपणाचे मोजमाप, डोळ्यांच्या स्नायूचे कार्य, त्रिमित दृष्टी (3D vision).

जर चष्म्याची गरज असेल, तर तो आधी दिला जातो.

काही मुलांमध्ये फक्त चष्म्यानेच तिरळेपणा सुधारतो.

**तिरळेपणाची शस्त्रक्रिया कशी केली जाते?**

डोळ्यांची दिशा ठरवणारे छोटे स्नायू असतात.

शस्त्रक्रियेमध्ये:

✻ हे स्नायू कधी घट्ट (tighten) केले जातात किंवा सैल (loosen) केले जातात

✻ त्यांच्या जागेत अचूक बदल केला जातो

ही एक अत्यंत सूक्ष्म आणि अनुभवावर आधारित शस्त्रक्रिया आहे.

**तिरळेपणाचे ऑपरेशन सुरक्षित आहे का?**

हो, तिरळेपणाची शस्त्रक्रिया सुरक्षित आणि प्रभावी आहे.

✻ अनुभवी सर्जनकडे केल्यास ९०–९५% सुधारणा मिळते

✻ जर उपचार वयाच्या ७–८ वर्षाच्या आत केले तर त्रिमित दृष्टी (3D vision) वाढते

✻ काही वेळा पुढे पुन्हा थोडा तिरळेपणा आला तर दुसरी शस्त्रक्रिया लागू शकते

**उपचार न केल्यास काय होऊ शकते?**

**तिरळेपणाकडे दुर्लक्ष केल्यास :**

✻ डोळा आळशी (mblyopia) होणे– दृष्टी कमी होऊ शकते

✻ त्रिमित दृष्टी (3D vision) कमी होते

✻ भावी जीवनात काही करियरमधे अडथळे येऊ शकतात (विमान पायलट, सर्जन, आर्मी)

✻ आत्मविश्वास कमी होतो

✻ सामाजिक संवाद आणि सार्वजनिक बोलण्यात अडचणी येऊ शकतात

**प्रौढांमध्ये :**

दुहेरी दिसणे (double vision) – जे खूप त्रासदायक असते

**अंतिम संदेश :** तिरळेपणा हा फक्त दिसण्याचा प्रश्न नाही – तो दृष्टी आणि व्यक्तिमत्त्वावर परिणाम करणारा आजार आहे. वेळेत निदान आणि योग्य उपचार केल्यास उत्कृष्ट परिणाम मिळू शकतात.



**– डॉ. निरंजन पेहेरे,**
**बालनेत्र रोग तज्ञ**



एफसीए कॉमर्स ॲकॅडमीतर्फे विद्यार्थ्यांसाठी 'औद्योगिक आणि बँकिंग भेटीचे'आयोजन करण्यात आले होते.

# एफसीए कॉमर्स ॲकॅडमीतर्फे विद्यार्थ्यांसाठी 'औद्योगिक आणि बँकिंग भेटीचे' आयोजन

नगर – सीए पवनकुमार दरक यांच्या 'FCA कॉमर्स ॲकॅडमी'ने विद्यार्थ्यांसाठी, वर्गातील शिक्षणापलीकडे जाऊन प्रत्यक्ष कामाचा अनुभव (practical exposure) आणि उद्योग–केंद्रित शिक्षण मिळावे या उद्देशाने, अहिल्यानगर येथील MIDC मध्ये स्थित 'गणेश फूड्स' येथे एका शैक्षणिक औद्योगिक व बँकिंग भेटीचे यशस्वी आयोजन केले.

या औद्योगिक भेटीदरम्यान, विद्यार्थ्यांना अन्न प्रक्रिया उद्योग आणि आधुनिक शीतगृह व्यवस्थापन प्रणालींविषयी (cold storage systems) मौल्यवान माहिती व अंतर्दृष्टी प्राप्त झाली. 'गणेश फूड्स'चे मालक रूपेश झंवर यांनी स्वतः विद्यार्थ्यांना उत्पादन आणि साठवणूक सुविधांची पाहणी घडवून आणली. तसेच, अन्न प्रक्रिया, पॅकेजिंग, गुणवत्ता जतन आणि शीतसाखळी व्यवस्थापनामध्ये (cold chain management) समाविष्ट असलेल्या विविध कार्यप्रणालींचे त्यांनी सविस्तर स्पष्टीकरण दिले.

औद्योगिक भेटीनंतर, विद्यार्थ्यांनी 'युनियन बँक ऑफ इंडिया'च्या चखऊ शाखेलाही भेट दिली. तिथे शाखा प्रमुख सचिन शिरसाठ यांनी विद्यार्थ्यांचे आत्मीयतेने स्वागत केले आणि बँकिंग कामकाज, ग्राहक सेवा, डिजिटल बँकिंग प्रणाली, कर्ज प्रक्रिया, आर्थिक व्यवस्थापन आणि बँकेच्या दैनंदिन कामकाजाविषयी सविस्तर माहिती दिली. त्यांनी बँकिंग आणि वित्तीय सेवा क्षेत्रात 'चार्टर्ड अकाउंटंट्स'ची वाढती भूमिका आणि उपलब्ध संधींविषयीही अधिक स्पष्टीकरण दिले. यामध्ये लेखापरीक्षण (audit), अनुपालन (compliance), जोखीम व्यवस्थापन, कर आकारणी आणि आर्थिक सल्लागार सेवा यांसारख्या क्षेत्रांवर त्यांनी विशेष भर दिला. वित्त आणि बँकिंग उद्योगांमध्ये आपले करिअर घडवू इच्छिणाऱ्या वाणिज्य शाखेच्या विद्यार्थ्यांसाठी हे सत्र अत्यंत माहितीपूर्ण ठरले.

# गृहिणी

## आरोग्य

### सुपरफूड ठरेल जांभूळ...

जांभूळ हे फळ मधुमेह नियंत्रणात ठेवण्यास आणि इतर अनेक आरोग्य समस्या टाळण्यास मदत करते. जांभूळ नेहमी थोडे काळे मीठ किंवा सैंधव मीठ घालूनच खा, यामुळे ते सहज पचते. उन्हाळ्यातील आहारात याचा समावेश केल्याने तुम्हाला साखर आणि रक्तदाब नियंत्रणात ठेवण्यास तर मदत होतेच, शिवाय तुमची रोगप्रतिकारशक्तीही वाढते. जांभळामध्ये व्हिटॅमिन सी आणि लोह भरपूर प्रमाणात असते. ते रक्त शुद्ध करते, मुरुमे कमी करते आणि त्वचेला नैसर्गिक चमक देते. याशिवाय, जांभळाची पाने आणि साल दात आणि हिरड्या मजबूत करण्यासाठी देखील वापरली जातात.

## पाककला

### ज्वारीचे धपाटे

**साहित्य** – ज्वारीचे पीठ २ वाट्या, बेसन (हरभरा डाळ पीठ) १/२ वाटी (खुसखुशीतपणासाठी), गव्हाचे पीठ १/४ वाटी (बाइंडिंगसाठी), कांदा १ मध्यम (बारीक चिरलेला), कोथिंबीर अर्धी वाटी (बारीक चिरलेली), हिरवी मिरची-लसूण पेस्ट १ मोठा चमचा, तीळ २ मोठे चमचे, ओवा १ छोटा चमचा (हातावर चोळून), हळद १/२ छोटा चमचा, लाल तिखट १ छोटा चमचा (आवडीनुसार), मीठ चवीनुसार, तेल भाजण्यासाठी, पाणी पीठ मळण्यासाठी

**कृती** – एका मोठ्या परातीत ज्वारीचे पीठ, बेसन आणि गव्हाचे पीठ एकत्र करा. त्यात चिरलेला कांदा, कोथिंबीर, मिरची-लसूण पेस्ट, तीळ, ओवा, हळद, तिखट आणि मीठ घालून सर्व जिन्नस कोरडेच मिक्स करा. आता थोडे थोडे पाणी घालून मध्यम मऊ पीठ मळून घ्या. (पीठ जास्त घट्ट किंवा जास्त सैल नसावे). एक सुती रुमाल ओला करून पोळपाटावर पसरवा. पिठाचा एक गोळा घेऊन तो रुमालावर ठेवा. हाताला पाण्याचा हात लावून गोलाकार धपाटा थापून घ्या. धपाटा थापून झाल्यावर त्यावर बोटाने ३-४ छोटी छिद्रे पाडा (जेणेकरून तेल सोडून ते छान भाजले जाईल). वरून थोडे तीळ पुन्हा लावू शकता. तवा गरम करून त्यावर थोडे तेल सोडा. रुमालासह धपाटा उचलून तव्यावर टाका आणि हळूच रुमाल काढून घ्या. खमंग भाजणे: छिद्रांमध्ये आणि कडेने थोडे तेल सोडा. झाकण ठेवून २ मिनिटे मध्यम आचेवर वाफ येऊ द्या. नंतर धपाटा उलटून दुसऱ्या बाजूनेही खरपूस, तांबूस रंग येईपर्यंत भाजा.

## वास्तू

### झोपण्याची योग्य दिशा

✻ दक्षिण दिशेला डोके करून झोपणे सर्वात शुभ मानले जाते. ही दिशा स्थिरता आणि सामर्थ्याचे प्रतीक आहे. असे मानले जाते की या दिशेला झोपल्याने पृथ्वीच्या चुंबकीय प्रभावाशी शरीराचा सम तोल सुधारतो.

✻ पूर्व दिशा ही सकारात्मकता आणि ज्ञानाची दिशा मानली जाते. या दिशेला डोके करून झोपल्याने मन शांत होते आणि तणाव कमी होतो.

## सौंदर्य

बेसन आणि हळद त्वचेवरील मृत पेशी काढून टाकतात आणि टॅनिंग कमी करतात. हे मुरुमांसाठी देखील उपयुक्त आहे.

## सल्ला

फ्रिजमध्ये भाज्या साठवताना भाज्यांच्या डब्यामध्ये एक टिशू पेपर ठेवा. हा पेपर भाज्यांम धील अतिरिक्त ओलावा शोषून घेतो, ज्यामुळे भाज्या सडत नाहीत. हिरव्या मिरच्यांचा देठ काढून त्या टिशू पेपरमध्ये गुंडाळून डब्यात ठेवल्यास त्या २०-२५ दिवस चांगल्या राहतात.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

**मंगळवार, दि. १२ मे २०२६**

**---, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, वैशाख कृष्णपक्ष, पू.भा. २५।१८, सूर्योदय ०६ वा. ३० मि. सूर्यास्त ०५ वा. २९ मि.**

## राशिभविष्य

**मेष** : कामात अडचणी येण्याची शक्यता आहे. काळजीपूर्वक कार्य करा. आपल्या क्रोधावर संयम ठेवल्याने दिवस आनंदात जाईल.

**वृषभ** : मानसिक सुख-शांतीचे वातावरण राहील. मातृपक्षाकडून सहयोग मिळेल. आर्थिक नुकसानीची शक्यता आहे.

**मिथुन** : घरात किंवा पैशांमध्ये वाढ झाल्याने आपणास आनंद मिळेल. आपला निष्काळजी दृष्टीकोण आज चांगला ठरणार नाही.

**कर्क** : आपल्या आत्मविश्वासाचा स्तर वाढविण्याचा प्रयत्न करा. धार्मिक भावना वाढेल. सामाजिक कार्यांमध्ये अनुकूल सहयोग मिळेल.

**सिंह** : अधिक श्रम करावे लागतील. व्यापार-व्यवसाय व आर्थिक विषयांमध्ये सावधगिरी बाळगावी लागेल.

**कन्या** : सामाजिक क्षेत्रांमध्ये अजून काही विशेष कार्ये होणार नाही. एखादी व्यक्ती निष्कारण आपल्याला त्रास देईल. अडचणी येण्याची शक्यता आहे.

**तूळ** : व्यवसायासाठी उत्तम वेळ. नवीन कामात यश मिळेल. वैवाहिक जीवनात वातावरण मधुर राहील.

**वृश्चिक** : आज रात्री विश्रांती घ्या. घर बदलण्यासाठी आजचा दिवस उत्तम आहे. शत्रू प्रभावहीन ठरतील. ध्येय साध्य करण्यात पूर्ण यश मिळेल.

**धनु** : विद्यार्थ्यांसाठी वेळ उत्तम. वाद-विवाद किंवा प्रतिस्पर्धा परीक्षांमध्ये यश मिळेल. अधिकाऱ्यांकडून कामे करवू शकाल. अपत्यांचा सहयोग मिळेल.

**मकर** : आजचा दिवस आपल्यासाठी नवीन सुरुवात करणे किंवा व्यक्तीमत्वाचे ध्येय निर्धारित करण्यात सहायक ठरेल.

**कुंभ** : नोकरदार व्यक्तींनी कार्यात सहयोग घेऊन चालावे. भविष्यात मान-सन्मानात वाढ होईल.

**मीन** : प्रिसिद्धी मिळेल. अडकेलेली कार्ये योग्य वेळी होतील. नोकरदार व व्यापारी बंधूंना लाभ मिळेल. आपल्या मनात असलेल्या योजना पूर्ण होतील.

## शब्दगंध क्र. ७४२७ सौ.शैलजा कुलकर्णी

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ■ | ५ | | |
| ६ | | | | ■ | | ■ | ■ |
| | ■ | ७ | | ■ | ८ | ९ | १० |
| ११ | १२ | ■ | १३ | १४ | | | |
| १५ | | ■ | १६ | | ■ | | ■ |
| ■ | | ■ | १७ | | १८ | ■ | १९ |
| २० | | २१ | | ■ | २२ | २३ | |
| २४ | | | ■ | २५ | | | |

**आडवे शब्द :-** १) भरपूर; खूप; पुष्कळ ५) ध्वनी; नाद; साउंड; रव ६) शासन; गव्हर्नमेंट ७) किसून काढलेला भाग ८) खडावा; पायांची प्रतिमा ११) महिना; माह; माहे १३) 'शेरीफ'चे मराठी रूप १५) माणूस; पुरुष; अर्जुन १६) उष्णतेमुळे त्वचेतून बाहेर पडणारे पाणी; घर्मबिंदू १७) जंगलसंपत्ती २०) ॲव्हरेज; मध्यम; साधारणतः २२) एक ग्रह २४) इंग्रजीत 'ध्वनिवर्धक'; इंग्रजी माणसाचे एक नाव २५) कागदाचे कापलेले बारीक तुकडे

**उभे शब्द :-** १) इस्लामधर्मीय माणूस २) एक होकारदर्शक शब्द; पू ३) चकाकी; तेज; चमक ४) एक निवृत्त अष्टपैलू भारतीय क्रिकेटपटू ५) अलीकडून पलीकडे; या बाजूपासून त्या बाजूपर्यंत ९) सकाळनंतरची उन्हाची वेळ १०) आजच्या आदला दिवस १२) पाहुणचार; आदरातिथ्य १४) जाणे; प्रस्थान करणे १८) धनवान; सधन; मालदार; तालेवार १९) त्रेधतिरपीट २०) पूर्ण भरतीची वेळ २१) सहाची पाढ्यातील संज्ञा २३) फळातील रसाळ भाग; मगज

### शब्दगंध क्र. ७४२६ चे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| स | दा | शि | व | ■ | पं | ज | र |
| ध्या | ■ | र | म | त | ग | म | त |
| ■ | सं | ग | न | म | त | ■ | न |
| सा | र | ण | ■ | ■ | ■ | बा | बा |
| ■ | क्ष | ती | ■ | ल | व | ल | व |
| प | ण | ■ | क | च | ■ | भा | ■ |
| रं | ■ | बा | ल | क | ■ | र | वा |
| तु | का | रा | म | ■ | प्र | ती | क |

# ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ मुलांचे विश्व ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻

**सुविचार** : त्यांनी फसवलं असे म्हणण्यापेक्षा, त्यांनी शिकवलं असे म्हणून पुढे चालत रहा!

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### टांझानियाचे सरोवर रहस्यमयी का आहे?

जगात अशी अनेक रहस्यमय सरोवरे आहे, जी अत्यंत धोकादायक मानली जातात. यापैकीच एक म्हणजे उत्तर टांझानियामध्ये असलेले नॅट्रॉन सरोवर. या सरोवराचे पाणी बहुतेक सजीवांसाठी प्राणघातक असल्यामुळे, फार कमी लोक त्याच्या किनाऱ्याजवळ जाण्याचे धाडस करतात.

नॅट्रॉन सरोवराचे पाणी अत्यंत गरम, खारट आणि उच्च अल्कधर्मी आहे. त्याची पीएच पातळी १०.५ पर्यंत पोहोचू शकते, जी सामान्य पाण्यापेक्षा कित्येक पटींनी जास्त आम्लधर्मी आहे. पाण्याचे तापमान अनेकदा ४० ते ६० अंश सेल्सिअसच्या दरम्यान असते. त्यात पडणारे बहुतेक प्राणी अल्पावधीतच मरतात आणि त्यांच्या मृतदेहांवर खनिजे जमा होऊन त्यांचे दगडात रूपांतर होते.

नॅट्रॉनची अद्वितीय रासायनिक रचना जवळच्या ज्वालामुखीच्या हालचालींमुळे आहे. सरोवरापासून सुमारे २० किलोमीटर अंतरावर असलेला ओई डोइनो लेंगाई ज्वालामुखी, सोडियम कार्बोनेटने समृद्ध असलेला लाव्हा बाहेर टाकतो. हा लाव्हा भूमिगत भेगांमधून गरम पाण्याच्या झऱ्यांच्या रूपात सरोवरात वाहतो. कमी पर्जन्यवृष्टी आणि जास्त बाष्पीभवनामुळे, पाणी अधिकाधिक सांद्र होत जाते. तथापि, या सरोवरात जीवनाचा एक अनोखा समतोल दिसून येतो. या कठोर परिस्थिती असूनही, काही जीव येथे भरभराटीस येतात. हॅलोआर्कियल्स नावाचे सूक्ष्मजीव पाण्यात मोठ्या संख्येने राहतात, ज्यामुळे सरोवराला लाल आणि गुलाबी रंगछटा प्राप्त होतात. विशेषतः, लेसर फ्लेमिंगो पक्षी सरोवराच्या आसपास मोठ्या संख्येने घरटी बांधतात. पूर्व आफ्रिकेतील सुमारे ७५ टक्के लेसर फ्लेमिंगो याच सरोवराच्या आसपास जन्मतात. हे पक्षी सरोवराच्या खारट पाण्यात वाढणाऱ्या सूक्ष्मजीवांवर जगतात, ज्यामुळे त्यांना भक्षकांपासून संरक्षण मिळते.

### एकतेचे बळ

एका घनदाट जंगलात एक छोटा ससा राहत होता. त्याचे घर एका मोठ्या झाडाच्या मुळांजवळ होते. एके दिवशी, एक जोरदार वादळ आले आणि ते झाड जोराने कोसळले. तो बिचारा ससा ओरडला, अरेरे! माझे घर उद्ध्वस्त झाले! आता मी कुठे राहू? तो निराशेने रडला. त्याच वेळी, त्याचा मित्र, पोपट, उडत आला. तो म्हणाला, रडू नकोस, मी मदतीसाठी बोलावतो.

थोड्याच वेळात हत्ती आणि खार आले. हत्तीने आपल्या सोंडेने जड ओंडके हलवले, खारीने चिखल फेकला आणि पोपटाने सर्वांना प्रोत्साहन दिले. त्या सर्वांनी मिळून खूप मेहनत केली आणि सशाचे घर पुन्हा बांधले. ससा आनंदाने उद्गारला, जेव्हा सर्वजण एकत्र असतात, तेव्हा कोणतीही समस्या मोठी वाटत नाही! त्या दिवशी, सर्वांना समजले की एकतेतच खरी शक्ती आहे आणि एकत्र काम केल्याने प्रत्येक कार्य सोपे होते.

तात्पर्य : एकत्र काम केल्याने कठीण वाटणारे प्रत्येक कार्य सोपे होते.

## जीवन का अमृत (भाग १)



### दिव्य ज्योती

हो चुकी है और उसके बोझ को आपने, सत्गुरु की दया से, बहुत अच्छे से वहन किया। पुराने कर्मों की वजह से शारीरिक परेशानियाँ समय-समय पर आ जाया करती हैं, जिनके द्वारा शिष्य शुद्ध हो जाता है, ताकि अंत में उसकी रूहानी तरक्की हो सके। आप इस बारे में किसी प्रकार का संदेह न करें, क्योंकि दयालु गुरु-सत्ता, शुद्ध शाकाहारी भोजन के द्वारा आपको खोई हुई शक्ति वापिस दिला देगी। पर आप वृद्धावस्था पेंशन के लिए अर्जी दे सकती हैं। यह आपके फायदे में रहेगी और आपके गुजारे के लिए भत्ता प्रदान करेगी। आपके प्रिय पति आपके लिए बहुत दयालु और अच्छे हैं और यह वास्तव में बहुत हर्ष की बात है। दयालु इंसानों को अपने शुभ कार्यों का भरपूर इनाम मिलता है। कृपया मेरा प्यार उस तक पहुँचाएँ । अगर आपकी मौजूदा शारीरिक हालत आपको बताई गई मुद्राओं में भजन- सिमरन नहीं करने देती, तो फर्क नहीं पड़ता। आप बिस्तर पर पूरी तरह या आधी लेटकर प्रेमपूर्वक तनाव मुक्त हो जाएँ और इसी भजन-सिमरन करें। आप सत्गुरु की दया से पायेंगी कि शरीर में दिव्य-चक्षु में मुद्रा के नीचे से सुरत की धारा का सिमटना संभव हो जाएगा और आप अंतर में दिव्य ज्योति और पवित्र शब्द धुन के परमानंद का लुत्फ उठाएँगी। आप अपनी नसों पर तनाव न डालें, बल्कि तनाव-मुक्त होना सीखें, पूरी तरह तनाव मुक्त हो जाएँ और गुरु-सत्ता द्वारा अपने आपको अंतर के शुद्ध शांति और आनंद के मंडलों में ले जाने दें। ३९. वे लोग सबसे ज्यादा भाग्यशाली हैं, जिन्हें अंतर में दसवें द्वार पर, प्रभु की ज्योति और शब्द-धुन से जोड़ दिया गया है और इसे वे दिन- प्रतिदिन बढ़ा सकते हैं। सारी की सारी इंसानियत, अनुमान, आवेग और भावनाओं के अँधेरे में भटक रही है और इस विलक्षण भेंट को लेने के लिए तैयार नहीं है। नामलेवाओं के अंतर में जो कुछ भी घटता है, सत्गुरु उससे भली-भाँति परिचित है और वह सदा उनके फायदे के लिए कार्य करता रहता है।

४०. अगर हम एक साथ दो नावों में पाँव रखेंगे, तो संभव है कि हम स्वयं के हित को ही नुकसान पहुँचाए। यह खेद की बात है कि- अपने ध्यान को इधर-उधर लगा रही है और इस प्रकार अपने स्वयं के रूहानी फायदे को चोट पहुँचा रही है। पर मुझे उससे प्रेम है और मैं यह देखकर खुश होऊँगा कि वह एकाग्रचित होकर, अपना ध्यान अपनी आध्यात्मिक उन्नति की ओर लगाए। जो संत-महात्मा संसार से जा चुके हैं, उनकी भी जरूरत है, क्योंकि उनके बेशकीमत रूहानी अनुभव, जो अब धर्मग्रथों का हिस्सा बन चुके हैं, हममें उन रूहानी अनुभवों और शांति को प्राप्त करने की इच्छा जागृत कर सकते हैं, जो उन संतो-महात्माओं ने पाए। पर दिव्य नियम के अनुसार हमें अपने आप के आंतरिक विकास के लिए एक जिंदा सत्गुरु की जरूरत होती है। यह अच्छा है कि आप इस तथ्य को पूरी तरह समझते हैं।

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

### आत्म्याचे मूळ गुण

जे काही आपल्यासाठी सहज होतं आणि आपला स्वभाव असायला हवा होता ते आपल्यासाठी आजकाल दुर्मीळ झालं आहे.

सुरेश ओबेरॉय : हास्य क्लबमध्ये लोकांना हसायला शिकवलं जातं. हसणंही शिकवायचं असतं का?

शिवानीदीदी : या स्थितीत आपण आलो आहोत. कारण आपण आपल्या नैसर्गिक स्वच्या संपर्कात नाही आहोत.

सुरेश ओबेरॉय : पण माणूस नेहमीच शांती, प्रेम आणि आनंदाचा शोध घेतो हे वादातीत आहे.

शिवानीदीदी : हे तीनही आपल्या आत्म्याचे मूळ गुण असूनही आपण ते अनुभवू शकत नाही म्हणून आपण ते बाहेर शोधत आहोत. जेव्हा इतरांशी संवाद साधताना आपण आपली प्रेमाची ऊर्जा वापरू आणि आपला प्रत्येक विचार, शब्द आणि कृती प्रेमाने ओथंबलेली असेल तेव्हा आपल्याला त्याचा अनुभव मिळेल.

जेव्हा आपले विचार, शब्द आणि व्यवहार क्रोधयुक्त असतात तेव्हा आपण प्रेमाचा अनुभव घेऊ शकत नाही. ते आपल्या आतून प्रवाहित होत नाही. पण आपल्याला आयुष्यात प्रेम हवं आहे म्हणून आपण त्याची इतरांकडून अपेक्षा ठेवतो. शुद्धता, शांती, प्रेम आणि शक्ती आत्म्याच्या या प्रत्येक गुणधर्माचा अनुभव आपल्याला पहिल्यांदा आतून यायला हवा. आपण जी काही ऊर्जा निर्माण करतो तिचा पहिला अनुभव घेणारेही आपणच असतो. तेव्हाच आपण ती ऊर्जा इतरांना देऊ शकतो.

सुरेश ओबेरॉय : जेव्हा मी स्वतःवर टीका करायचो आणि स्वतःचा तिरस्कार करायचो तेव्हा त्याच मनःस्थितीत मी झोपी जायचो आणि दुसऱ्या दिवशी उदासे उठायचो. मला कोणाशीही बोलायची इच्छा नसायची आणि इतरांपासून लांब राहण्यासाठी मी कारणं शोधायचो.

शिवानीदीदी : कारण आपण जे निर्माण करतो तेच अनुभवतो.

सुरेश ओबेरॉय :

पण आता प्रेमाच्या अवस्थेमध्ये कसं यायचं ?

शिवानीदीदी :

तुम्ही निर्माण करत असलेल्या प्रत्येक विचाराची गुणवत्ता बदलण्याकडे लक्ष द्या. तुमची विचारपद्धती बदलली नाही तर तुम्हाला ज्या भावना अनुभवायच्या आहेत त्या तुम्ही अनुभवू शकणार नाही. समजा, तुम्ही स्वतःचा तिरस्कार करत आहात पण तुमच्या आजूबाजूचे सगळे तुमच्यावर प्रेम करत आहेत. ते सगळे तुम्हाला प्रेमाची ऊर्जा देत आहेत, पण तुम्ही कोणती ऊर्जा निर्माण करत आहात ?

सुरेश ओबेरॉय : तरीही मी असाच विचार करेन की सगळे माझा तिरस्कार करतात.

शिवानीदीदी : तुम्हाला मिळणारी पहिली ऊर्जा ही स्व-तिरस्काराची असेल.

सुरेश ओबेरॉय : इतर लोक माझ्यावर प्रेम करतात यावर मी विश्वास ठेवणार नाही.

शिवानीदीदी : तुम्ही त्यांच्यावर विश्वास का ठेवू शकत नाही?

सुरेश ओबेरॉय :

कारण मी स्व-तिरस्कार करण्यातच सुख मानतो आहे. शिवानीदीदी : तुम्ही त्यांच्या प्रेमाचे तरंग अनुभवू शकत नाही. कारण तुमच्या भोवती स्व-तिरस्काराच्या तरंगांचं वलय आहे. समजा, तुम्ही एअर कंडिशन्ड खोलीत प्रवेश केला, आणि तुम्ही एकावर एक खूप गरम कपडे घातले असतील तर तुम्हाला इतरांसारखा तिथल्या थंड हवेचा अनुभव घेता येणार नाही.

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

बायको : अहो तुम्ही शेजारच्या काकांना नेहमी बोलत असता 'देव तुम्हाला माफ करणार नाही', असं काय केले त्यांनी?

नवरा : 'असं काय केलं?' अगं तुझे स्थळ तेच घेऊन आले होते.

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

✻ युद्धातील शौर्य व बलीदान चक्र कोणास जाहीर झाले होते?

– मेजर सोमनाथ शर्मा

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आहारवेद – आरोग्य संवर्धन

### शरीराची झीज भरुन काढण्यासाठी

निरोगी आयुष्य जगण्यासाठी व रोग झालाच, तर त्याचे निवारण करण्यासाठी भाज्या एक उत्तम संरक्षक अन्न आहे. शरीराची झालेली झीज भरून काढून त्याची वाढ करण्यासाठी आवश्यक असणारे सर्व अन्न व औषधी घटक भाज्यांमध्ये असतात.

औषधी गुणधर्म :

भाज्या या अनेक प्रकारच्या असतात. पालेभाज्या, कंदमुळे, फळभाज्या, बिया या सर्व भाज्यांमध्ये शरीरास उपयुक्त पोषक औषधी व अन्नघटक असतात. पालेभाज्यांमध्ये निरनिराळे क्षार, जीवनसत्त्वे, फायबर (चोथा) यांचे प्रमाण भरपूर असते. त्यामुळे ज्या व्यक्तींना मलावष्टंभाचा त्रास होतो, अशा व्यक्तींनी आहारामध्ये नियमित पालेभाज्यांचे सेवन करावे. यामध्ये असणाऱ्या फायबरमुळे आतड्यांची हालचाल वाढते व त्यामध्ये असणाऱ्या सारक गुणधर्मामुळे मलप्रवृत्ती साफ होते. कंदमुळामध्ये अनेक जीवनसत्त्वे असून, त्याच्या सेवनाने थकवा आलेल्या शरीरात उत्साह निर्माण होतो. फळभाज्यांमध्ये खनिजे, जीवनसत्त्वे, पाणी व तंतुमय पदार्थांचा साठा पुरेशा प्रमाणात असतो. वेगवेगळ्या बियांमध्ये प्रथिने व पिष्टमय पदार्थ विपुल प्रमाणात असतात. शरीराचे रक्षण करण्यासाठी या भाज्यांबरोबरच बटाटे, रताळी, सुरण यांसारखी मांसल मुळे, खोडे व शेंगा याही भाज्या महत्त्वाच्या असतात. या सर्व भाज्यांमधून शरीरास आवश्यक असणारी कर्बोदके विपुल प्रमाणात मिळून शरीराला उत्साह व ऊर्जा मिळते. अशाप्रकारे शरीराची जडणघडण, बांधणी या सर्व भाज्यांवर अवलंबून असते. आयुर्वेदामध्ये अनेक ठिकाणी वेगवेगळ्या पालेभाज्या, कंदमुळे यांचे गुण, रोग दूर करण्याची त्यांच्यामध्ये असणारी क्षमता, आहारामध्ये असणारे त्यांचे महत्त्व यांचे वर्णन अनेक ठिकाणी केले आहे.

जीवनसत्त्वे :

शरीराची रोगप्रतिकारक शक्ती वाढून विविध जंतूंपासून रक्षण करण्यासाठी जीवनसत्त्वांची आवश्यकता असते. विविध त्वचारोगांपासून श्वासमार्गाच्या रोगांपर्यंत संरक्षण करण्यासाठी, तसेच अनेक प्रकारच्या ॲलर्जीपासून शरीराचे रक्षण करण्यासाठी जीवनसत्त्वांची आवश्यकता असते. अनेक भाज्यांमध्ये कॅरोटीन नावाचे द्रव्य असते. या द्रवामुळे 'अ' जीवनसत्त्व तयार होते. याचा उपयोग शरीराची ऊर्जा व उत्साह वाढविण्यासाठी होतो. तसेच डोळ्यांची दृष्टी सुधारणे, त्वचा कांतियुक्त राहणे, रोगप्रतिकारक शक्ती

(क्रमशः)

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर
मोबाईल नं- ८७९३४००४००

# अर्थजगत

**भारतीय अर्थव्यवस्थेतील पारदर्शकता वाढवण्यासाठी आणि काळ्या पैशाला आळा घालण्यासाठी केंद्र सरकारने १ एप्रिल २०२६ पासून 'प्राप्तिकर कायदा २०२५' अंतर्गत व्यवहारांच्या नियमांत कठोर बदल केले आहेत. या नवीन नियमांनुसार, उच्च मूल्याच्या व्यवहारांसाठी आता 'पॅन' सादर करणे अनिवार्य करण्यात आले आहे. तसेच पूर्वी उपलब्ध असलेली 'फॉर्म ९७' ची सवलत आता पूर्णपणे रद्द करण्यात आली आहे.**

## पॅनकार्डबाबतचे नवे नियम कुणासाठी?

नवीन तरतुदीनुसार, एखाद्या व्यक्तीकडे 'पॅन' नसेल, तर तिला ठराविक मर्यादेपेक्षा जास्त रकमेचे व्यवहार करता येणार नाहीत. यापूर्वी 'पॅन' नसलेल्या व्यक्तींना 'फॉर्म ६०' किंवा तत्सम घोषणापत्र देऊन व्यवहार करण्याची मुभा होती, परंतु नवीन कर प्रणालीत ही पळवाट बंद करण्यात आली आहे. विशेषतः स्थावर मालमत्तेची खरेदी, महागड्या गाड्यांची विक्री आणि मोठ्या रकमेच्या बँक गुंतवणुकीसाठी आता केवळ 'पॅन' हाच एकमेव अधिकृत पुरावा मानला जाईल. जर एखाद्या व्यवहारामध्ये 'पॅन' दिलेला नसेल, तर तो व्यवहार कायदेशीररित्या अवैध ठरू शकतो किंवा त्यावर दंडात्मक कारवाई होऊ शकते.




■ स्थावर मालमत्तेच्या बाबतीत, ५० लाख रुपयांपेक्षा जास्त किमतीच्या घराच्या किंवा जमिनीच्या खरेदी-विक्रीसाठी 'पॅन' अनिवार्य आहे. खरेदीदाराने 'पॅन' सादर केला नाही, तर नोंदणी प्रक्रिया पूर्ण होऊ शकणार नाही. तसेच, दुचाकी किंवा चारचाकी वाहनांच्या खरेदीच्या वेळीही हीच अट लागू असेल.

■ बँकिंग क्षेत्राचा विचार केल्यास, एकाच दिवशी ५०,००० रुपयांपेक्षा जास्त रोख रक्कम जमा करण्यासाठी किंवा परकीय चलनाच्या खरेदीसाठी आता 'पॅन'शिवाय पर्याय उरलेला नाही. शेअर्स, म्युच्युअल फंड आणि डिबेंचर्समधील मोठ्या गुंतवणुकीसाठीही ही तरतूद लागू करण्यात आली आहे.

■ क्रेडीट कार्ड किंवा डेबिट कार्डसाठी अर्ज करताना, तसेच हॉटेलची बिले ५० हजार रुपयांच्या वर असल्यास 'पॅन'ची विचारणा केली जाईल.

**■ अर्थ-धोरण**

■ या बदलांमागे प्रत्येक मोठ्या आर्थिक व्यवहाराचा मागोवा घेता यावा, हा उद्देश असून तो स्वागतार्ह आहे. ज्या व्यक्तींचे उत्पन्न करपात्र आहे, त्यांनी कर जाळ्यात येणे अपेक्षित आहे. कारण त्यामुळे एकूण करसंकलन वाढण्याबरोबरच विषमता दूर होण्यासही मदत होणार आहे.

■ 'फॉर्म ९७' सारखी पर्यायी कागदपत्रे आता स्वीकारली जाणार नसल्यामुळे, ज्यांच्याकडे अद्याप 'पॅन' नाही अशा नागरिकांना ते तातडीने काढून घेणे आवश्यक झाले आहे.

■ या नियमांचे उल्लंघन केल्यास केवळ व्यवहार थांबणार नाही, तर संबंधित व्यक्तीवर प्राप्तिकर विभागाकडून चौकशी आणि मोठ्या दंडाची टांगती तलवार असेल. बँका आणि वित्तीय संस्थांनाही आता 'पॅन'शिवाय कोणतेही उच्च मूल्याचे व्यवहार न करण्याचे सक्त निर्देश देण्यात आले आहेत.

■ डिजिटल क्रांतीच्या युगात आर्थिक शिस्त लावण्यासाठी आणि कर संकलन अधिक कार्यक्षम करण्यासाठी हे पाऊल उचलले गेले आहे. नागरिकांनी आर्थिक व्यवहार सुरळीत ठेवण्यासाठी आता प्रत्येक मोठ्या व्यवहारासोबत 'पॅन'ची जोडणी करणे अनिवार्य आहे.

■ या नवीन बदलामुळे करचोरीला मोठ्या प्रमाणात आळा बसेल आणि प्रामाणिक करदात्यांना व्यवहारात अधिक स्पष्टता मिळेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. ◆◆◆




**वैयक्तिक वित्त नियोजनामध्ये क्रेडिट स्कोअर ही अत्यंत महत्त्वाची बाब मानली जाते. अनेकदा असा प्रश्न उपस्थित होतो की, आपल्या जोडीदाराच्या क्रेडिट हिस्ट्रीचा आपल्या स्वतःच्या क्रेडिट स्कोअरवर परिणाम होतो का? तांत्रिकदृष्ट्या पाहिल्यास, लग्नानंतरही पती आणि पत्नी या दोघांचे क्रेडिट रिपोर्टस् स्वतंत्र असतात. जोपर्यंत तुम्ही कोणतेही कर्ज किंवा क्रेडिट कार्ड संयुक्तपणे घेत नाही, तोपर्यंत जोडीदाराच्या खराब पतमानांकाचा तुमच्या वैयक्तिक क्रेडिट स्कोअरवर कोणताही थेट परिणाम होत नाही. मात्र, काही विशिष्ट परिस्थितीत जोडीदाराची आर्थिक वर्तणूक तुमच्या पतमानांकावर परिणाम करू शकते.**

## जोडीदाराचा क्रेडिट स्कोअरही महत्त्वाचाच?

तुम्ही गृहकर्ज किंवा वाहन कर्जासाठी 'सह-अर्जदार' किंवा को-ॲप्लिकंट म्हणून अर्ज केला असेल, तर अशा वेळी दोघांचीही क्रेडिट हिस्ट्री तपासली जाते. यामध्ये जोडीदाराचा स्कोअर कमी असेल, तर बँका कर्ज नाकारू शकतात किंवा जास्त व्याजदर आकारू शकतात.

● **'जॉईंट क्रेडिट कार्ड'** वापरत असताना जोडीदाराने देणी वेळेवर भरली नाहीत, तर त्याचा फटका दोघांच्याही क्रेडिट स्कोअरला बसतो.

तुम्ही जोडीदाराच्या कर्जासाठी 'हमीदार' (गॅरेंटर) म्हणून स्वाक्षरी केली असेल, तर त्यांच्याकडून हप्ते थकल्यास तुमची पतही धोक्यात येऊ शकते.

● **उत्तम क्रेडिट स्कोअर राखण्यासाठी :** सर्वात महत्त्वाचे म्हणजे आपल्या सर्व कर्जांचे हप्ते आणि क्रेडिट कार्डची बिले वेळेवर भरणे. विलंबाने केलेले पेमेंट क्रेडिट स्कोअर वेगाने खाली आणते. दुसरे म्हणजे, आपल्या क्रेडिट मर्यादेचा पूर्ण वापर न करता तो ३० टक्क्यांच्या आत ठेवण्याचा प्रयत्न करावा. वारंवार नवीन कर्जासाठी चौकशी करणे किंवा अनेक क्रेडिट कार्डसाठी अर्ज करणे टाळावे, कारण यामुळे तुम्ही 'कर्जबाजारी' असल्याचे संकेत मिळतात आणि स्कोअरवर नकारात्मक परिणाम होतो.

क्रेडिट रिपोर्टमध्ये काही तांत्रिक चुका असण्याची शक्यता असते. त्यामुळे ठराविक अंतराने आपला क्रेडिट रिपोर्ट तपासून पाहणे फायदेशीर ठरते. रिपोर्टमध्ये कोणतीही चुकीची नोंद आढळली, तर ती संबंधित क्रेडिट ब्युरोकडून

**■ माहीत हवे**

दुरुस्त करून घ्यावी. जुनी क्रेडिट खाती बंद करणे टाळावे, कारण जितका तुमचा क्रेडिट इतिहास जुना असेल, तितकी तुमची विश्वासार्हता अधिक मानली जाते.

कौटुंबिक आर्थिक सुरक्षिततेसाठी पती-पत्नी दोघांनीही आपापला क्रेडिट स्कोअर उत्तम राखणे गरजेचे आहे. जरी तुमचे स्कोअर स्वतंत्र असले, तरी भविष्यात मोठे कर्ज घेताना दोघांची आर्थिक शिस्त महत्त्वाची ठरते. एकमेकांच्या आर्थिक व्यवहारांबाबत पारदर्शकता ठेवल्यास आणि संयुक्त दायित्वांची जबाबदारी वेळेवर पार पाडल्यास वैयक्तिक पतमानांकन भक्कम राहण्यास मदत होते. ◆◆◆

## बदल नवे, दिलासा नवा!

भारताच्या कर प्रणालीत १ एप्रिल २०२६ पासून अत्यंत महत्त्वाचे बदल लागू झाले असून, प्राप्तिकर कायदा १९६१ ची जागा आता 'प्राप्तिकर कायदा २०२५' ने घेतली आहे. या नवीन कायद्यांतर्गत करपरताव्याच्या नियमांमध्ये दोन मुख्य बदल करण्यात आले असून ते करदात्यांच्या दृष्टीने अत्यंत दिलासादायक आणि प्रशासकीय प्रक्रिया सुलभ करणारे ठरणार आहेत.




यामधील पहिला महत्त्वपूर्ण बदल हा कर परताव्याच्या समायोजनाशी संबंधित आहे. पूर्वीच्या नियमांनुसार, एखाद्या करदात्याचा जुन्या कायद्यांतर्गत (१९६१ चा कायदा) परतावा येणे बाकी असेल आणि नवीन कायद्यांतर्गत (२०२५ चा कायदा) काही कर देणे प्रलंबित असेल, तर त्यांचे परस्परांशी समायोजन करणे तांत्रिकदृष्ट्या कठीण होते. मात्र, नव्या कायद्यानुसार आता जुन्या आणि नवीन दोन्ही कायद्यांमधील कर परतावा आणि प्रलंबित कर मागणी यांचे एकमेकांशी समायोजन करण्यास परवानगी देण्यात आली आहे.

एखाद्या करदात्याचा एखाद्या वर्षाचा परतावा येणे बाकी असेल, तर तो दुसऱ्या वर्षाच्या थकीत करापोटी वळता केला जाऊ शकतो; भलेही तो कोणत्याही कायद्यांतर्गत का असेना.

या महत्त्वपूर्ण बदलामुळे करदात्यांना विनाकारण पैसे भरण्याची गरज भासणार नाही आणि प्रशासकीय गोंधळही कमी होण्यास मदत होईल.

दुसरा महत्त्वाचा बदल हा परताव्यावरील व्याजाच्या गणनेबाबत आहे. नव्या नियमांनुसार, मागील वर्षांच्या कर परताव्यावरील व्याजाची गणना करताना स्पष्टता आणली गेली आहे. त्यानुसार करदात्यांचे जुन्या वर्षांचे परतावे असले, तरी १ एप्रिल २०२६ नंतर लागू होणारे व्याजाचे दर हे नवीन कायद्यानुसार निश्चित केले जातील. यामुळे व्याजाच्या दरांबाबतची संभ्रमावस्था दूर झाली असून करदात्यांना त्यांच्या परताव्यावर मिळणाऱ्या व्याजाची अचूक माहिती मिळू शकेल. व्याजाचे दर आणि तरतुदी यांची स्पष्ट विभागणी केल्यामुळे कर संकलनाची प्रक्रिया अधिक पारदर्शक होणार आहे.

कर विवरणपत्र भरण्याच्या मुदतीतही

**■ जाणून घ्या**

काही सुधारणा करण्यात आल्या आहेत. त्यानुसार लेखापरीक्षणाची (ऑडिट) आवश्यकता असणाऱ्या व्यावसायिक करदात्यांसाठी विवरणपत्र भरण्याची अंतिम तारीख ३१ जुलैऐवजी आता ३१ ऑगस्ट करण्यात आली आहे. मात्र, पगारदार व्यक्तींसाठी ३१ जुलै हीच तारीख कायम राहील. तसेच, सुधारित विवरणपत्र भरण्याची मुदत ९ महिन्यांवरून वाढवून १२ महिने करण्यात आली आहे. यामुळे करदात्यांना चुका दुरुस्त करण्यासाठी अधिक वेळ मिळेल.

याखेरीज ज्येष्ठ नागरिकांसाठी 'फॉर्म १२५' हा नवीन पर्याय उपलब्ध करून देण्यात आला आहे. ७५ वर्षांवरील ज्या ज्येष्ठ नागरिकांचे उत्पन्न केवळ पेन्शन आणि व्याजातून मिळते, त्यांना आता विवरणपत्र भरण्याच्या कटकटीतून मुक्तता मिळेल.

या सर्व बदलांचा मुख्य उद्देश कर प्रणाली अधिक आधुनिक, सुटसुटीत आणि तंत्रस्नेही बनवणे हा आहे. नवीन कायद्यात कलमांची संख्या कमी करून भाषा सोपी करण्यात आली आहे, जेणेकरून कायदेविषयक गुंतागुंत सहज समजेल. या सुधारणांमुळे करदात्यांचा वेळ वाचणार असून कर विभागाशी होणारे वादही कमी होण्यास मदत होईल. नवीन आर्थिक वर्षात कर नियोजन करताना या बदलांची नोंद घेणे प्रत्येक करदात्यासाठी अनिवार्य आहे. ◆◆◆

## ८०० हून अधिक सिबिल स्कोअरचे फायदे

'सिबिल स्कोअर' हा तुमच्या आर्थिक आरोग्याचा आरसा मानला जातो. ज्या करदात्यांचा किंवा कर्जदारांचा स्कोअर ८०० च्या वर असतो, त्यांना बँकिंग क्षेत्रात 'व्हीआयपी' वागणूक मिळते. उच्च स्कोअर केवळ विश्वासार्हता दर्शवत नाही, तर तो भविष्यातील आर्थिक व्यवहारांमध्ये लाखो रुपयांची बचत करून देऊ शकतो.

उच्च स्कोअचा सर्वात मोठा फायदा म्हणजे कर्जावरील कमी व्याजदर. बँका अशा ग्राहकांना 'कमी जोखमीचे' मानतात, त्यामुळे त्यांना गृहकर्ज, कार लोन किंवा वैयक्तिक कर्जावर बाजारातील सर्वात कमी व्याजदर ऑफर केले जातात. अगदी ०.२५ ते ०.५० टक्क्यांचा फरकही कर्जाच्या दीर्घ मुदतीत मोठी बचत घडवून आणतो. उदाहरणार्थ, गृहकर्जासारख्या मोठ्या रकमेच्या व्यवहारात थोडासा कमी झालेला व्याजदर तुमच्या खिशातील लाखो रुपये वाचवू शकतो.

दुसरा महत्त्वाचा फायदा म्हणजे कर्जाची जलद मंजुरी. बँकांकडे जेव्हा ८०० प्लस स्कोअर असलेला अर्ज येतो, तेव्हा त्याची कागदपत्र पडताळणी आणि मंजुरीची प्रक्रिया अत्यंत वेगाने पार पडते. अशा ग्राहकांसाठी बँका अनेकदा 'प्री-अप्रूव्ड' कर्जाचे पर्याय उपलब्ध करून देतात. यामुळे ऐनवेळी पैशांची गरज भासल्यास कोणतीही धावपळ करावी लागत नाही. याशिवाय, प्रक्रिया शुल्कामध्ये सूट मिळवण्यासाठीही तुम्ही बँकेशी वाटाघाटी करू शकता, कारण तुमची पत भक्कम असल्याने बँका तुम्हाला गमावू इच्छित नाहीत.

उत्तम क्रेडिट स्कोअरमुळे तुम्हाला क्रेडिट कार्डांच्या निवडीतही अधिक स्वातंत्र्य मिळते. बाजारातील सर्वोत्तम रिवॉर्ड पॉईंट्स्, कॅशबॅक आणि विमानतळ लाउंज ॲक्सेस देणारी 'प्रीमियम' क्रेडिट कार्ड्स् अशा व्यक्तींना सहज उपलब्ध होतात. तसेच, या कार्डांची क्रेडिट मर्यादा देखील खूप जास्त असते. यामुळे आपत्कालीन परिस्थितीत मोठी रक्कम उपलब्ध होऊ शकते. उच्च मर्यादेमुळे तुमचा 'क्रेडिट युटिलायझेशन




रेशो' कमी राहतो, जो पुन्हा तुमचा स्कोअर स्थिर ठेवण्यास मदत करतो.

बँकिंग क्षेत्राव्यतिरिक्त, आता अनेक विमा कंपन्या आणि काही मोठ्या बहुराष्ट्रीय कंपन्या नोकरी देताना उमेदवाराचा क्रेडिट रिपोर्ट तपासू लागल्या आहेत. उत्तम सिबील स्कोअर असणारी व्यक्ती जबाबदार

**■ अर्थसल्ला**

असते, असा एक व्यावसायिक समज रूढ होत आहे. त्यामुळे ८०० पेक्षा जास्त स्कोअर असणे हे केवळ स्वस्त कर्जासाठीच नाही, तर सर्वांगीण आर्थिक प्रतिष्ठेसाठी गरजेचे झाले आहे.

हा स्कोअर कायम राखण्यासाठी वेळेवर पेमेंट करणे, जुनी खाती चालू ठेवणे आणि विनाकारण अनेक कर्जे न काढणे हे नियम पाळणे महत्त्वाचे आहे.

८०० प्लस सिबिल स्कोअर सन्मानाने आणि कमी खर्चात आर्थिक उद्दिष्टे गाठण्याची संधी देते. ही एक प्रकारची 'आर्थिक संपत्ती' आहे, जिची जोपासना करणे प्रत्येकाचे कर्तव्य ठरते. ◆◆◆

## 'आयटीआर-४' मधील बदलांविषयी...

प्राप्तिकर विभाग आणि केंद्र सरकारने कर संकलनाची प्रक्रिया अधिक पारदर्शक करण्यासाठी 'आयटीआर-४' या अर्जात अत्यंत महत्त्वाचे बदल केले आहेत. प्रामुख्याने व्यावसायिक आणि छोट्या करदात्यांसाठी असलेल्या या अर्जात आता गुंतवणुकीची माहिती देणे अनिवार्य करण्यात आले असून, यामुळे 'प्रिझम्प्टिव्ह टॅक्सेशन' अंतर्गत कर भरणाऱ्यांच्या जबाबदाऱ्यांमध्ये वाढ झाली आहे.

या नवीन बदलांनुसार, ज्या करदात्यांनी कलम ४४ एडी, ४४ एडीए किंवा ४४ एई अंतर्गत आपल्या उत्पन्नाची घोषणा केली आहे, त्यांना आता त्यांच्या वर्षभरातील गुंतवणुकीचा सविस्तर तपशील अर्जात द्यावा लागेल. पूर्वी केवळ ढोबळ उत्पन्न आणि नफा दर्शवून काम भागत असे, मात्र आता मालमत्ता आणि दायित्वांच्या व्यतिरिक्त, विविध आर्थिक साधनांमधील गुंतवणुकीची माहिती देणे बंधनकारक करण्यात आले आहे. यामध्ये प्रामुख्याने मुदत ठेवी, शेअर्स, म्युच्युअल फंड आणि इतर महत्त्वाच्या गुंतवणुकीचा समावेश आहे.

कर विवरणपत्र भरताना करदात्यांनी सर्वात आधी आपली वैयक्तिक माहिती आणि उत्पन्नाचा स्रोत निश्चित करणे आवश्यक आहे. त्यानंतर 'शेड्युल बीपी' मध्ये व्यवसायाचा नफा आणि इतर माहिती भरावी लागते. या नवीन बदलामुळे आता 'फायनान्शिअल पर्टिकुलर्स ऑफ द बिझनेस' या रकान्यात अधिक अचूकता राखणे गरजेचे झाले आहे. विशेषतः रोख व्यवहार आणि डिजिटल व्यवहार यांची स्वतंत्रपणे नोंद करणे




आवश्यक आहे, कारण डिजिटल व्यवहारांवर कराचा दर कमी (६ टक्के) असून रोख व्यवहारांवर तो अधिक (८ टक्के) आहे.

**■ टॅक्स झोन**

गुंतवणुकीच्या माहितीचा समावेश करण्यामागील मुख्य कारण म्हणजे करदात्याच्या उत्पन्नाचा आणि त्याच्या खर्चाचा किंवा गुंतवणुकीचा मेळ घालणे हे आहे. एखाद्या करदात्याने दाखवलेले उत्पन्न आणि त्याने केलेली गुंतवणूक यात मोठी तफावत आढळली, तर कर विभागाकडून त्याबाबत विचारणा केली जाऊ शकते. त्यामुळे आता केवळ उत्पन्नाचा अंदाज न देता, प्रत्यक्षात आपल्याकडे असलेले भांडवल कोठे गुंतवले आहे, याचा नेमका आकडा देणे अनिवार्य आहे.

छोट्या व्यापाऱ्यांसाठी आणि व्यावसायिकांसाठी ही प्रक्रिया आता थोडी अधिक तांत्रिक झाली आहे. पूर्वी 'बॅलन्स शीट' तयार करण्याची गरज नसली, तरी आता गुंतवणुकीच्या माहितीमुळे अप्रत्यक्षपणे मालमत्तेचा तपशील समोर येणार आहे. करदात्यांनी आपले बँक खाते, गुंतवणुकीचे प्रमाणपत्रे आणि मागील वर्षाचे आर्थिक दस्तऐवज सोबत ठेवूनच हा अर्ज भरावा, जेणेकरून कोणतीही चुकीची माहिती दिली जाणार नाही.

अंतिम टप्प्यात, सर्व माहिती भरून झाल्यावर कर विवरणपत्राची पडताळणी करणे विसरू नका. 'ई-व्हेरिफिकेशन' मुळे ही प्रक्रिया अधिक जलद होते. १ एप्रिल २०२६ पासून लागू झालेल्या या नवीन नियमांमुळे कर प्रणालीत उत्तरदायित्व वाढले असून, करदात्यांनी आपल्या आर्थिक नियोजनामध्ये अधिक सुसूत्रता आणणे आता काळाची गरज बनली आहे. चुकीची माहिती दिल्यास किंवा माहिती लपवल्यास दंडात्मक कारवाई होऊ शकते, याची नोंद घेणे महत्त्वाचे आहे. ◆◆◆

## घरातल्या सोन्यावर मिळवा व्याज!

भारतातील घराघरांमध्ये पडून असलेले सोने उत्पादक कामासाठी वापरता यावे आणि त्यातून नागरिकांना नियमित उत्पन्न मिळावे, या उद्देशाने भारतीय रिझर्व्ह बँकेने 'सुवर्ण मुद्रीकरण योजना' अधिक प्रभावीपणे राबवण्यास सुरुवात केली आहे. ही योजना म्हणजे केवळ सोने सुरक्षित ठेवण्याचे साधन नसून, आपल्याकडील सोन्यावर व्याज मिळवून देणारी एक गुंतवणुकीची संधी आहे. १ एप्रिल २०२६ पासून लागू झालेल्या नवीन आर्थिक सुधारणांच्या पार्श्वभूमीवर या योजनेतील तरतुदी अधिक सुटसुटीत करण्यात आल्या आहेत.

**■ काय सांगताय?**



या योजनेअंतर्गत कोणतीही व्यक्ती, हिंदू अविभक्त कुटुंब, ट्रस्ट किंवा कंपन्या आपल्याकडील सोन्याचे दागिने, नाणी किंवा बिस्किटे बँकेत जमा करू शकतात. या सोन्याचे शुद्धीकरण करून ते सरकारी तिजोरीत जमा केले जाते आणि त्या बदल्यात ग्राहकाला प्रमाणपत्र दिले जाते.

या योजनेचा सर्वात मोठा फायदा म्हणजे, तुमच्याकडे पडून असलेल्या सोन्यावर तुम्हाला वार्षिक २.५ ते २.७५ टक्क्यांपर्यंत व्याज मिळू शकते. हे व्याज मूळ सोन्याच्या वजनावर किंवा त्याच्या मूल्यावर आधारित असल्याने सोन्याचे भाव वाढल्याचा फायदा मिळतोच, शिवाय वरून व्याजाची कमाईही होते.

गुंतवणुकीच्या कालावधीनुसार या योजनेचे अल्प मुदत (१ ते ३ वर्षे), मध्यम मुदत (५ ते ७ वर्षे) आणि दीर्घ मुदत (१२ ते १५ वर्षे) असे तीन प्रकार पडतात. मुदत संपल्यानंतर ग्राहकाला सोन्याच्या स्वरूपात किंवा त्यावेळच्या बाजारभावानुसार रोख रकमेच्या स्वरूपात परतावा घेण्याचा पर्याय उपलब्ध असतो.

विशेष म्हणजे, या योजनेतून मिळणारे व्याज हे प्राप्तिकरातून पूर्णपणे मुक्त आहे. त्यावर संपत्ती कर किंवा भांडवली नफा कर आकारला जात नाही. यामुळे कर नियोजनाच्या दृष्टीने ही एक सुरक्षित गुंतवणूक मानली जाते.

योजनेत सहभागी होण्याची प्रक्रिया आता अत्यंत सोपी झाली आहे. ग्राहकाला जवळच्या अधिकृत बँक शाखेत किंवा शुद्धता पडताळणी केंद्रावर जाऊन सोन्याची चाचणी करावी लागते. शुद्धता तपासल्यानंतर ते वितळवले जाते आणि शुद्ध सोन्याचे वजन निश्चित केले जाते. या प्रक्रियेनंतर बँकेत सुवर्णखाते उघडले जाते. पूर्वी दागिन्यांच्या घडणावळीचे नुकसान होईल या भीतीने लोक मागे सरकत असत, परंतु आता सोन्याच्या वाढत्या किमती आणि मिळणारे व्याज पाहता, पडून असलेल्या दागिन्यांचे भांडवलात रूपांतर करणे अधिक फायद्याचे ठरत आहे. देशाच्या अर्थव्यवस्थेसाठीही ही योजना अत्यंत महत्त्वाची आहे. भारताला दरवर्षी मोठ्या प्रमाणात सोने आयात करावे लागते. यासाठी प्रचंड प्रमाणात परकीय चलन खर्च होते. अशा वेळी देशातील लाखो कुटुंबांमध्ये पडून असणारे सोने चलनात आले, तर सोन्याची आयात कमी होईल आणि देशाची व्यापार तूट कमी होण्यास मदत होईल. नागरिकांसाठी आपल्या सोन्याची सुरक्षा, लॉकरच्या खर्चातून सुटका आणि वरून हक्काची कमाई अशा तिहेरी फायद्यांमुळे 'गोल्ड मॉनिटायझेशन स्कीम' ही २०२६ मधील एक उत्तम गुंतवणूक योजना ठरत आहे. आपल्याकडील निष्क्रिय सोन्याला सक्रिय करण्याचा हा एक सुरक्षित आणि सरकारी हमी असलेला मार्ग आहे. ◆◆◆

# पोलीस उपनिरीक्षक गणेश वारुळे व किर्तनकार दिपालीताई गणगे यांना पुरस्कार जाहीर

**निमगाव वाघा येथील सहाव्या राज्यस्तरीय ग्रामीण मराठी साहित्य संमेलनात होणार गौरव**

नगर – छत्रपती संभाजी महाराज, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त निमगाव वाघा (ता. नगर) येथे १७ मे रोजी सहावे राज्यस्तरीय ग्रामीण मराठी साहित्य संमेलन उत्साहात आयोजित करण्यात आले आहे. ग्रामीण भागातील साहित्य, संस्कृती, समाजप्रबोधन आणि लोकपरंपरांचा जागर करणाऱ्या या संमेलनात राज्यभरातील नामवंत साहित्यिक, कवी, समाजप्रबोधक सहभागी होणार आहेत.

या संमेलनात पोलीस दलात उल्लेखनीय कार्य करणारे नगर तालुका पोलीस ठाण्यातील पोलीस उपनिरीक्षक गणेश वारुळे यांना 'उत्कृष्ट पोलीस अधिकारी पुरस्कार' जाहीर करण्यात आला आहे. तसेच वारकरी परंपरेचा वारसा जपत किर्तनाच्या माध्यमातून समाजप्रबोधन करणाऱ्या युवा किर्तनकार ह.भ.प. सौ. दिपालीताई गणगे (कोकाटे) यांना 'संत तुकडोजी महाराज जीवन साधना पुरस्कार' जाहीर करण्यात आला असल्याची माहिती संमेलनाचे मुख्य संयोजक पै. नाना डोंगरे यांनी दिली.

स्व. पै. किसनराव डोंगरे बहुद्देशीय संस्था, श्री नवनाथ युवा मंडळ आणि धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालय यांच्या संयुक्त विद्यमाने या साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. ग्रामीण भागातील साहित्यिकांना व्यासपीठ उपलब्ध करून देणे, नवोदित लेखकांना प्रोत्साहन देणे आणि समाजात वैचारिक जागृती निर्माण करणे हा या संमेलनाचा मुख्य उद्देश आहे.




संमेलनात विविध साहित्यिक परिसंवाद, विचारमंथन सत्रे आणि काव्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले असून राज्यातील अनेक कवी व कवयित्री आपल्या कविता सादर करणार आहेत. तसेच छत्रपती संभाजी महाराज, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या जीवनकार्यावर आधारित पोवाडे, अभंग आणि प्रेरणादायी कविता सादर करून त्यांच्या कार्याला अभिवादन केले जाणार आहे. ग्रामीण संस्कृती, राष्ट्रभक्ती आणि समाजजागृतीचा संगम या संमेलनातून अनुभवायला मिळणार आहे.

पोलीस उपनिरीक्षक गणेश वारुळे यांनी पोलीस सेवेत अत्यंत कर्तव्यदक्षपणे काम करत अनेक गुन्ह्यांची उकल केली आहे. गुन्हेगारांवर वचक निर्माण करताना सर्वसामान्य नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण करण्याचे कार्य त्यांनी केले आहे. त्यांच्या तत्पर कार्यपद्धतीमुळे नागरिकांमध्ये पोलिसांविषयी आदर आणि विश्वास वाढला असल्याचे मानले जाते. विविध गुन्हे उघडकीस आणून अनेक गुन्हेगारांना जेरबंद करण्यात त्यांची महत्त्वपूर्ण भूमिका राहिली आहे. त्यांच्या या उल्लेखनीय कार्याची दखल घेत त्यांना 'उत्कृष्ट पोलीस अधिकारी पुरस्कार' प्रदान करण्यात येणार आहे.

दरम्यान, चिचोंडी पाटील येथील युवा किर्तनकार ह.भ.प. सौ. दिपालीताई गणगे (कोकाटे) या आपल्या प्रभावी किर्तन शैलीतून समाजप्रबोधनाचे कार्य करत आहेत. अध्यात्म, संस्कार आणि नैतिक मूल्यांचा संदेश देत त्या युवक-युवतींना योग्य दिशा देण्याचे काम करीत आहेत. वारकरी संप्रदायाची परंपरा आधुनिक काळात प्रभावीपणे जपण्याचे कार्य त्यांनी केले असून धार्मिक व सामाजिक विषयांवर जनजागृती घडवून आणली आहे. त्यांच्या या प्रेरणादायी कार्याची दखल घेऊन त्यांना 'संत तुकडोजी महाराज जीवन साधना पुरस्कार' जाहीर करण्यात आला आहे. या राज्यस्तरीय ग्रामीण मराठी साहित्य संमेलनात समाजातील विविध क्षेत्रांत निस्वार्थ भावनेने कार्य करणाऱ्यांचाही गौरव करण्यात येणार आहे.



१७ व्या शब्दगंध साहित्य संमेलनाच्या स्वागताध्यक्षपदी सुरेश बनसोडे यांची निवड करण्यात आली. (छाया - लहू दळवी)

# 'शब्दगंध साहित्य संमेलना'च्या स्वागताध्यक्षपदी सुरेश बनसोडे

नगर – शब्दगंध साहित्यिक परिषदेच्या वतीने २३ व २४ मे रोजी आयोजित राज्यस्तरीय १७ व्या शब्दगंध साहित्य संमेलनाच्या स्वागताध्यक्षपदी नगरसेवक तथा राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) सामाजिक न्याय विभागाचे जिल्हाध्यक्ष सुरेश बनसोडे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे. ही निवड आमदार संग्राम जगताप यांच्या कार्यालयात पार पडलेल्या बैठकीत जाहीर करण्यात आली. यावेळी शब्दगंध परिषदेचे अध्यक्ष राजेंद्र उदागे, कार्याध्यक्ष ज्ञानदेव पांडुळे, सचिव सुनील गोसावी, खजिनदार भगवान राऊत उपस्थित होते.

प्रा. डॉ. संदीप सांगळे यांच्या अध्यक्षतेखाली हे साहित्य संमेलन जाधव लॉन्स, कल्याण रोड, अहिल्यानगर येथे होणार आहे.

स्वागताध्यक्ष निवडीसाठी आयोजित बैठकीस राज्य कार्यकारणी सदस्य सुभाष सोनवणे, प्रा. डॉ. तुकाराम गोंदकर, प्रा. डॉ. अनिल गर्जे, बबनराव गिरी, प्रशांत सूर्यवंशी, मकरंद घोडके, बाळासाहेब देशमुख, प्रा. हर्षल आगळे, प्रा. एल.बी. जाधव, शर्मिला गोसावी, स्वाती ठुबे, सुरेखा घोलप, विशाल तागड, दत्तू साळवे आदी उपस्थित होते.

निवडीबद्दल सुरेश बनसोडे यांचा शब्दगंधचे कार्याध्यक्ष ज्ञानदेव पांडुळे यांच्या हस्ते शाल, पुष्पगुच्छ, स्मरणिका व ग्रंथ देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी सुरेश बनसोडे यांनी, १७ वे शब्दगंध साहित्य संमेलन दिमाखदार पद्धतीने पार पाडण्यासाठी सर्वतोपरी सहकार्य करणार असून, नवोदित साहित्यिकांना सहभागी करून हे संमेलन यशस्वी करण्यासाठी प्रयत्न केले जातील, अशी ग्वाही दिली.

प्रास्ताविक सुभाष सोनवणे यांनी केले, भगवान राऊत यांनी परिचय करून दिला, तर शेवटी प्रा. डॉ. अनिल गर्जे यांनी आभार मानले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहसचिव स्वाती ठुबे यांनी केले.

# विदर्भातील प्राध्यापक संघटनेचे श्री विशाल गणपती चरणी साकडे

नगर – महाराष्ट्र राज्य ज्युनिअर कॉलेज प्राध्यापक संघटनेच्या विदर्भ ज्युनिअर कॉलेज प्राध्यापक संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी अहिल्यानगर येथील शहराचे ग्रामदैवत असलेल्या श्री विशाल गणपती मंदिर येथे दर्शन घेऊन प्राध्यापकांच्या विविध प्रलंबित प्रश्न सुटण्यासाठी श्री गणेशाला साकडे घातले. या शिष्टमंडळाने मंदिरात दर्शन घेतले.



महाराष्ट्र राज्य ज्युनिअर कॉलेज प्राध्यापक संघटनेच्या विदर्भ ज्युनिअर कॉलेज प्राध्यापक संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी अहिल्यानगर येथील शहराचे ग्रामदैवत असलेल्या श्री विशाल गणपती मंदिर येथे दर्शन घेऊन प्राध्यापकांच्या विविध प्रलंबित प्रश्न सुटण्यासाठी श्री गणेशाला साकडे घातले.

दर्शनासाठी आलेल्या संघटनेच्या पदाधिकाऱ्यांचे शहराचे आमदार संग्राम जगताप यांच्या वतीने श्री विशाल गणपती देवस्थानचे विश्वस्त तथा संघटनेचे माजी राज्य उपाध्यक्ष प्रा. माणिक विधाते यांनी सत्कार केला. या प्रसंगी विजुक्टाचे महासचिव डॉ. अशोक गव्हाणकर, सहसचिव डॉ. अभिजित पोटले, नागपूर शहर सचिव डॉ. गजानन धांडे, महासंघ प्रतिनिधी प्रा. भाऊराव गोरे, चंद्रपूर जिल्हा सचिव डॉ. प्रमोद उरकुडे, जिल्हाध्यक्ष डॉ. प्रवीण चटप, संघटन सचिव प्रा. धर्मेश मुनघाटे, गडचिरोली जिल्हाध्यक्ष प्रा. विजय कुत्तरमारे, प्रा. पारखी सर, अहिल्यानगर जिल्हाध्यक्ष प्रा. सोपानराव कदम यांच्यासह विविध जिल्ह्यांतील प्रतिनिधी उपस्थित होते.

राज्यभरातील प्राध्यापकांच्या समस्या शासन स्तरावर तातडीने सुटण्यासाठी श्री गणेश चरणी प्रार्थना केली. ज्युनिअर कॉलेज प्राध्यापकांच्या विविध प्रलंबित मागण्या, सेवाशर्ती, वेतनविषयक प्रश्न, अनुदान, रिक्त पदे, शैक्षणिक सुविधा आणि प्राध्यापकांना भेडसावणाऱ्या प्रशासकीय अडचणी या विषयांवर शासनाने सकारात्मक भूमिका घ्यावी, अशी अपेक्षा महासचिव डॉ. अशोक गव्हाणकर यांनी व्यक्त केली.

प्रा. माणिक विधाते यांनी या संघटनेचे राज्य उपाध्यक्ष म्हणून काम केले असल्याने प्राध्यापकांच्या प्रश्नाची जाणीव आहे. शिक्षण क्षेत्र सक्षम करण्यासाठी प्राध्यापकांना न्याय मिळणे अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. शिक्षक आणि प्राध्यापक हे शिक्षण व्यवस्थेचा कणा असून त्यांच्या समस्या सोडविल्याशिवाय गुणवत्तापूर्ण शिक्षण व्यवस्था निर्माण होऊ शकत नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.

# महिलांच्या नेत्र तपासणीने मातृत्व दिवस साजरा

**फिनिक्स फाऊंडेशनतर्फे नेत्र तपासणी शिबिरास महिलांचा प्रतिसाद**

नगर – मातृत्व दिनाचे औचित्य साधत फिनिक्स सोशल फाऊंडेशनच्या वतीने नागरदेवळे (ता. नगर) येथे महिलांसाठी मोफत नेत्र तपासणी, आरोग्य तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले. समाजातील ज्येष्ठ महिला, गरजू नागरिकांचा या शिबिराला प्रतिसाद लाभला. नागरदेवळे येथील संत सावता महाराज मंदिर परिसरात आयोजित या शिबिरात नेत्रदान व अवयवदानाबाबत जनजागृती करण्यात आली. अनेक महिलांनी यावेळी नेत्रदान व अवयवदानाचा संकल्प करत सामाजिक बांधिलकीची जाणीव व्यक्त केली. या शिबिराचे उद्घाटन उपस्थित महिलांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी फिनिक्स सोशल फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष जालिंदर बोरुडे, बुधराणी हॉस्पिटलचे विशाल भिंगारदिवे, ग्रामस्थ, महिला व फिनिक्सचे पदाधिकारी उपस्थित होते.



मातृत्व दिनाचे औचित्य साधत फिनिक्स सोशल फाऊंडेशनच्या वतीने नागरदेवळे (ता. नगर) येथे महिलांसाठी मोफत नेत्र तपासणी, आरोग्य तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले.

फिनिक्स सोशल फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष जालिंदर बोरुडे म्हणाले की, मातृत्वाचे ऋण कोणत्याही स्वरूपात फेडता येत नाही. आई आपल्या मुलांसाठी आयुष्यभर त्याग, प्रेम आणि संघर्ष करत असते. तिचे उपकार अनंत असतात. मातृत्व दिन हा केवळ शुभेच्छांचा दिवस नसून, आईच्या आरोग्याची काळजी घेण्याचा आणि तिच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस आहे. समाजातील अनेक माता आणि ज्येष्ठ महिला स्वतःच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करतात. ग्रामीण भागातील अनेक महिलांना योग्य आरोग्यसेवा वेळेत मिळत नाही. अशा महिलांपर्यंत आरोग्यसेवा पोहोचविण्याचा प्रयत्न फिनिक्स सोशल फाऊंडेशनच्या माध्यमातून सातत्याने केला जात आहे. माध्यमातून अनेक दृष्टीहीन व्यक्तींना नवदृष्टी मिळाली आहे. अंधकारमय जीवन जगणाऱ्या सर्वसामान्यांच्या आयुष्यात प्रकाश निर्माण करण्याचे कार्य आमची संस्था करत आहे. नेत्रदान आणि अवयवदान ही मानवतेची मोठी सेवा असून, प्रत्येकाने यासाठी पुढाकार घेण्याचे त्यांनी आवाहन केले.

शिबिरात तज्ञ डॉक्टरांच्या उपस्थितीत एकूण २७० रुग्णांची नेत्र तपासणी करण्यात आली. तपासणीनंतर ४७ रुग्णांवर पुणे येथील के.के. आय बुधराणी हॉस्पिटलमध्ये मोफत मोतीबिंदू व काचबिंदू शस्त्रक्रिया करण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली. याशिवाय ज्येष्ठ नागरिकांची रक्तदाब, मधुमेह तसेच इतर आरोग्य तपासण्या करण्यात आल्या. गरजू रुग्णांना अल्पदरात चष्म्यांचे वाटप करून आरोग्यविषयक मार्गदर्शनही करण्यात आले. शिबिर यशस्वी करण्यासाठी गौरव बोरुडे, सौरभ बोरुडे, राजेंद्र बोरुडे, ओम बोरुडे, बुधराणी हॉस्पिटलचे सचिन पगार तसेच फिनिक्स सोशल फाऊंडेशनच्या पदाधिकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये १५ मे रोजी मोफत 'मणके विकार तपासणी शिबीर'

नगर – जैन सोशल फेडरेशनद्वारे संचालित आनंदऋषिजी हॉस्पिटल अॅण्ड मेडिकल रिसर्च सेंटर येथे १५ मे रोजी सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत मोफत मणके विकार तपासणी शिबीर आयोजित करण्यात आले आहे. या शिबिरात पाठदुखी व मणक्याच्या आजारांवर निदान, उपचार व शस्त्रक्रिया याबाबत मार्गदर्शन केले जाईल. मणकेविकार व अस्थिरोग तज्ञ डॉ. दत्तात्रय जगताप, डॉ. श्रीकांत दलाल, डॉ. विशाल शिंदे, डॉ. रोहन धोत्रे रूग्ण तपासणी व उपचार मार्गदर्शन करणार आहेत.



हॉस्पिटलमध्ये पाठदुखी व मणक्यांच्या आजारांवर प्रभावी उपचार सुविधा उपलब्ध आहेत. तसेच अत्याधुनिक तंत्रज्ञानाने शस्त्रक्रियाही करण्यात येतात. या उपचार सुविधांचा जास्तीत जास्त रूग्णांना लाभ मिळावा यासाठी या शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

आनंदऋषीजी हॉस्पिटीलमध्ये डिजिटल एक्स रे २५० रूपये, सोनोग्राफी कलर प्रिंट व रिपोर्टसह ८०० रूपये (संपर्क : मो. ९४०५२७१८७८), सिटी स्कॅन १२५० रूपये (संपर्क : मो. ९४०४२९९९११), एम. आर. आय. २५०० रूपये रुपयात उपलब्ध आहे. रात्री १ ते पहाटे ५ यावेळेत एम.आर.आय. केल्यास ७५० रूपयांची सूट दिली जाईल. (संपर्क : मो. ९४०४२९७४११). २४ तास आनंदऋषीजी ब्लड सेवा. हायटेक पॅथोलॉजी लॅब, ३५ अत्याधुनिक डायलिसिस मशीनद्वारे उपचार सेवा उपलब्ध आहेत. हॉस्पिटलच्या पॅथोलॉजी लॅबच्यावतीने ब्लड सॅम्पल घरी येऊनही घेतले जाते. त्यामुळे रूग्णांच्या वेळेत बचत होते. (होम ब्लड सॅम्पलसाठी संपर्क : मो. ९३७३८०७८४२.).

मोफत मणके विकार तपासणी शिबिराच्या रूग्णांनी लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे.

अधिक माहितीसाठी संपर्क : ०२४१-२३२०४७३/ ७४/७५ / ७६.



राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, नवी दिल्ली तसेच राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्या निर्देशानुसार जिल्हा विधी सेवा प्राधिकरणातर्फे प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश शिवाजी कचरे यांच्या मार्गदर्शनाखाली ९ मे रोजी जिल्हा न्यायालय तसेच जिल्ह्यातील सर्व तालुका न्यायालयांमध्ये राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले होते.

# राष्ट्रीय लोकअदालतीत ३५ हजार ९३२ प्रकरणे निकाली

**सुमारे ५० कोटी रुपयांची तडजोड; जिल्हा न्यायालयासह सर्व तालुका न्यायालयांमध्ये राष्ट्रीय लोकअदालत उत्साहात**

नगर – राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, नवी दिल्ली तसेच राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्या निर्देशानुसार जिल्हा विधी सेवा प्राधिकरणातर्फे प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश शिवाजी कचरे यांच्या मार्गदर्शनाखाली ९ मे रोजी जिल्हा न्यायालय तसेच जिल्ह्यातील सर्व तालुका न्यायालयांमध्ये राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले. या लोकअदालतीत मोठ्या प्रमाणावर प्रकरणांचा निपटारा होऊन सुमारे ५० कोटी रुपयांची तडजोड करण्यात आली असल्याची माहिती जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव योगेश पैठणकर यांनी दिली.

राष्ट्रीय लोकअदालतीत जिल्ह्यातील विविध न्यायालयांमधील दिवाणी व फौजदारी प्रकरणे, धनादेश व चेक अनादर प्रकरणे, बँक कर्जवसुली प्रकरणे, मोटार वाहन अपघात नुकसान भरपाई दावे, कामगार न्यायालयातील प्रकरणे, कौटुंबिक वाद, वीज महावितरणाशी संबंधित समझोता योग्य प्रकरणे तसेच न्यायालयात दाखल होण्यापूर्वीची दाखलपूर्व प्रकरणे आपसी समझोत्यासाठी ठेवण्यात आली होती.

लोकअदालतीमध्ये जिल्ह्यातील एकूण ३३ हजार ८१६ दाखलपूर्व प्रकरणे मिटविण्यात आली तर २ हजार ११६ प्रलंबित प्रकरणांचा निपटारा करण्यात आला. तसेच विशेष मोहिमेंतर्गत ८७८ प्रकरणे निकाली काढण्यात आली. अशा प्रकारे एकूण ३५ हजार ९३२ प्रकरणे यशस्वीरित्या निकाली काढण्यात आली.

राष्ट्रीय लोकअदालत यशस्वी करण्यासाठी जिल्ह्यातील सर्व न्यायाधीश, सर्व वकील संघटना, जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद कार्यालय, जिल्हा पोलीस प्रशासन यांचे सहकार्य लाभले. तसेच जिल्ह्यातील सर्व न्यायालयीन कर्मचारी व विधी सेवा प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांनीही विशेष योगदान दिले.

# कुंदनऋषिजी महाराज साहेब

**समता शिरोमणी पदाने अलंकृत**

आनंदधाम – राष्ट्रसंत आचार्य सम्राट आनंदऋषिजी म सा यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या आनंदधामच्या प्रांगणात आचार्य भगवंतांचे ज्येष्ठ शिष्य मौनसाधक महाश्रमण गुरुदेव कुंदनऋषिजी म सा यांचा ६५ वा दीक्षादिवस महोत्सव चतुर्विध संघाच्या उपस्थितीत झाला.



मंगलाचरण व नवकार महामंत्र जाप, आनंद धून ने गुरु गुणानुवाद सभेची सुरुवात झाली. सुजिज्ञाजी म सा, विनितदर्शनाजी म सा या साध्वींनी सुंदर भजन द्वारा प्रवर्तकश्रीजीं च्या संयमी जीवनाचे गुणगान केले.

दिव्ययशाजी म. सा., अर्चनाजी म. सा., सत्यप्रभाजी म. सा. इत्यादी साध्वीजींनी आपल्या शुभकामना मनोगत मध्ये सांगितले की, प्रवर्तकश्रीजीं नी आनंद गुरु च्या चरण मध्ये समर्पित होऊन संयमी जीवन सार्थक केले. यथा नाम तथा गुण कार्य करुन आपले जीवन कुंदन प्रमाणे प्रकाशित केले. सेवा, समता, सहजता, मधुरता, समर्पणता, सहनशीलता इत्यादी गुण संपदा मुळे गुरुदेव पूजनीय बनले.

प्रबुध्द विचारक आदर्शऋषिजी म. सा. यांनी प्रवर्तकश्रीजीं च्या जुन्या आठवणींना उजाळा दिला. आचार्य भगवंत आनंदऋषिजी म सा यांची सेवा, गुरु प्रति त्यांची निष्ठा - भक्ति ही अनन्य साधारण होती. स्थिरता, देह प्रति अनासक्त भाव असल्यामुळे ९२ व्या वर्षाच्या बुजुर्ग अवस्थेत ही प्रवर्तकश्रीजी एका जागेवर स्थिर बसून आहेत, हे सांगत आदर्शऋषिजीनी गुण अनुमोदना केली. अनुमोदना संस्कार दिवाकर आलोकऋषिजी म. सा. यांनी आपल्या सूत्रसंचालन द्वारे गुरु विषयी श्रध्दा, आत्मीयता भाव व्यक्त केले.

श्रावक संघा तर्फे संतोष गांधी यांनी प्रवर्तकश्रीजींना दीक्षादिवसाच्या शुभेच्छा दिल्या. श्रीमती सक्करबाई मेहेर, मनिषा मुनोत, देशना चुत्तर यांनी प्रवर्तक गुरुदेवांना दीक्षादिवस ची हार्दिक शुभेच्छा दिल्या.

गुरुदेवांचे जीवन विशेषतः समता, सहनशीलता गुणाने ओतप्रोत भरलेले आहे. कोणत्याही परिस्थितीत न डगमगता ते पूर्ण मनोबलाने कठीण प्रसंगात धीर - गंभीर राहतात. आबालवृध्द असो किंवा गरीब - श्रीमंत, सर्वांबरोबर आपुलकी, जिव्हाळा ही त्यांची विशेषता आहे.

आनंद कुल च्या सर्व साधु - साध्वींजींच्या वतीने महाराष्ट्र प्रवर्तक कुंदनऋषिजी म. सा. यांना आदरची चादर अर्पण करुन त्यांना समता शिरोमणी उपाधि ने अलंकृत केले.

या कार्यक्रमासाठी अहिल्यानगर शहर तसेच अन्य क्षेत्रातून हजारो श्रावक - श्राविका उपस्थित होते. त्यांनी दीर्घ दीक्षा पर्याय असलेल्या गुरुदेवांच्या संयमी जीवनाची अनुमोदना केली.

१३ मे रोजी पिंपळगाव बसवंत येथिल सुश्राविका श्रीमती विजयाबाई कोचर यांची जैन भागवती दीक्षा सकाळी १० :३० वाजता होणार आहे. दोन्ही दिवशी उपस्थित राहून बंधु - भगिनींनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन श्री वर्धमान स्था. जैन श्रावक संघ व श्री तिलोकरत्न जैन धार्मिक परीक्षा बोर्ड, अहिल्यानगर च्या वतीने करण्यात आले आहे.

# ‘श्रीरामकृष्ण’ मध्ये गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव सोहळा



नगर – श्रीराम कृष्ण एज्युकेशन फाउंडेशनचे सेठ नंदलाल धूत इंग्लिश मीडियम स्कूल व मोहनलाल रामावतार मानधना ज्युनिअर कॉलेज मध्ये इ. दहावी व बारावीच्या परीक्षेत घवघवीत यश संपादन करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा उत्साहात पार पडला.

विद्यालयात तील इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांचा निकाल ९८.९०% लागला असून यशाची परंपरा त्यांनी कायम ठेवली आहे.

विद्यालयाची विद्यार्थिनी कु. स्वस्तिका हेमंत नागपुरे इंग्रजी, मराठी, हिंदी, संस्कृत, विज्ञान, इतिहास, भूगोल या सर्व विषयांमध्ये सर्वाधिक गुण मिळवून तसेच ९७.४०% मिळवून विद्यालयात प्रथम आली आहे. ९३.२०% गुण मिळवून पार्थ शैलेश अंतरकर हा विद्यार्थी द्वितीय तर ९२.८०% गुण मिळवून आर्या पंकज लड्डा, कृष्णा किरण यादव हे विद्यार्थी तृतीय आले आहेत. गणित या विषयात १०० पैकी ९९ गुण मिळवून श्लोक पंकज कुथल हा प्रथम आला आहे. एकूण विद्यार्थ्यांमध्ये दहा विद्यार्थ्यांनी ९०% पेक्षा जास्त गुण मिळवले आहेत. त्याचबरोबर ३० विद्यार्थ्यांनी ७५ % पेक्षा जास्त गुण गुण मिळवले आहेत. २९ विद्यार्थी प्रथम श्रेणीत आले असून, द्वितीय श्रेणीत २० तर तृतीय श्रेणीत १ विद्यार्थी आला आहे.

तसेच महाविद्यालयामध्ये वाणिज्य विभागातून मेहक डुंगुरवाल ही ९४.२०% गुण मिळवून प्रथम, रिया मणियार ९२.८३% द्वितीय, प्रणव वाघमारे ९१.८३ तृतीय याचबरोबर विज्ञान विभागातून खुशी तीपुले ही ८५.६७% गुण मिळवून प्रथम, हर्षल फसले ८०.३३% द्वितीय, अन्वेषा मंत्री ७९.१७ % तृतीय आली आहे. या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना गुलाब पुष्प व भेटवस्तू देऊन सन्मानित करण्यात आले.

संस्थेचे उपाध्यक्ष व शाला समितीचे चेअरमन नंदकुमार झंवर यांच्या संतत प्रेरणेतून शिक्षक व त्यायोगे विद्यार्थ्यांनी हे यश संपादित केले आहे असे संस्थेचे सचिव डॉ. शरद कोलते यांनी यावेळी सांगितले.

संस्थेचे उपाध्यक्ष मोहनलाल मानधना यांनी विद्यार्थ्यांना पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

तसेच संस्थेचे सचिव डॉक्टर शरद कोलते यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे, पालकांचे, शिक्षकांचे कौतुक केले. तसेच पुढील आयुष्यात जास्तीत जास्त गुण मिळवा परंतु त्या विषयाचे सखोल ज्ञान प्राप्त करा असा संदेश त्यांनी विद्यार्थ्यांना दिला.

इयत्ता दहावी व बारावीच्या यशस्वी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणाऱ्या उपस्थित असलेल्या विषय शिक्षक सौ. सराला काथेड, सौ. रीना रौथेल, सौ. शिल्पा दिवटे, सौ. मौसमी लोंढे, सौ. मुग्धा देवकर, सौ. नितल फिरोदिया, सौ. सोनिया शर्मा, कु. ध्रुवा परदेशी, श्रेयाकुमार गुंडू, अजित लोळगे, प्रकाश सोनार, संपदा देशपांडे यांचा कमिटीतर्फे सत्कार करण्यात आला. तसेच इयत्ता बारावी वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांना उत्तम मार्गदर्शन केल्याबद्दल अप्राईज अॅकॅडमीचे सीए उमेश डोडेजा, सी ए चिराग कासवा, सौ. प्रज्ञा मुनोत व आशिष तटू यांचा देखील कमिटीतर्फे सत्कार करण्यात आला.

यावेळी पालक म्हणून उपस्थित असलेले संस्थेचे सभासद किरण मणियार व सौ. अंतरकर या दोन्ही पालकांनी मनोगते व्यक्त केली.

विद्यालयाच्या प्राचार्या सौ. गगनप्रीत वाधवा यांनीही यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

यावेळी संस्थेचे अध्यक्ष श्रीगोपाल धूत, उपाध्यक्ष व शाळा समितीचे चेअरमन नंदकुमार झंवर, उपाध्यक्ष मोहनलाल मानधना, सचिव डॉ. शरद कोलते, सहसचिव बजरंग दरक, संस्थेचे सभासद रवींद्र गुजराथी, पुरुषोत्तम पटेल, श्रीगोपाल जाखोटिया, लक्ष्मीकांत झंवर, सीए किरण मणियार यांनी कार्यक्रमास उपस्थित राहून विद्यार्थ्यांचे कौतुक केले. उपप्राचार्य संपदा देशपांडे व समन्वय सुषमा उजागरे यांनी यशस्वी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देऊन त्यांचे कौतुक केले.

सूत्रसंचालन समन्वय श्रेयकुमार गुंडू यांनी केले.

# प्रेरणादायी अक्षरधन

## हे अवघे आपणापासी

"मुसाफिर" संकलन: दिशान फिचर्स

माणसाचा स्वभाव विचित्रच आहे. जे सहज मिळते, ते त्याला नको असते. जे मिळालेले नसते, त्याच्या मागे त्याचे मन धावत सुटते. ’हातातला एक पक्षी, झुडपातल्या दहापेक्षा मौल्यवान लक्षी’ ही केवळ म्हण म्हणूनच उरते. मन त्या झुडपाकडेच ओढ घेते. मग ते दहा तर उडून जातातच, पण हातचेही सुटते. अजब आहे माणसाची वृत्ती. त्याला हवा असतो उन्हाळ्यात हिवाळा. आणि हिवाळ्यात उन्हाळा. होते आहे, घडते आहे, मिळते आहे, ते त्याला नको. त्याच्या विरुद्ध मिळवायची चिंता, ओढ, धडपड आणि त्यापायी येणारी अस्वस्थता ओढवून घेण्यातच त्याला शौर्य वाटते. बसतो मग कुरकूर करीत; सुख, आनंद, शांती, स्वत:च लाथाडीत.




भगवंत म्हणतात, ही कुठली रे माणसा तुझी लक्षणं? हे कुठले तुझे धर्म ? जसा जाळणं हा अग्नीचा धर्म, तप्त भांड्यांना हात लावणाऱ्यांना संतप्त करणं, हा त्या भांड्याचा धर्म, तसे तुझे ? पण बा माणसा, त्या निर्जीव गोष्टी. त्यांचा तो नियत धर्म, ते नाही सांडू शकत ते. पण तू सजीव! तुला तर वागण्याचे विकल्प. तुला तर दिलाय विचार. तुझे हे सगळी सुखशांती व समाधान घालवणारे धर्म आणि त्यानुसार होणारे कर्म, अनियत आहेत. तुझ्या हातचेच आहेत. त्यामुळेच होतेय तुझी चिडचिड. सुखी जीवनाला लागते कीड. तेव्हा दे सोडून ते सर्व धर्म.

अरे संताप, दु:ख, चिडचिड दे सोडून. या तुझ्या सगळ्या त्रासातून, संकटातून मी तुला सोडवेन. तू फक्त माझे ऐक. जे मिळते आहे, जे घडते आहे, ते तसे होऊ दे. उगाच भटक्या मनाच्या नादी लागून, त्या सगळ्याविरुद्ध कशाला धडपडतोस? सत्प्रवृत्तीने वाग. प्रामाणिकपणे प्रयत्न कर. हिमतीने उभा हो, कल्याण साधण्यात आत्मबळ कामी आण.

हे सगळे माणसाला कळते; फक्त वळत नाही. इतरांना दोष देण्यात अर्थ नाही. आपल्या मनाला समजावलं पाहिजे. प्रामाणिक व अचूक प्रयत्न करायला धैर्य, औदार्य व आत्मबळ लागते. ते असूनही वापरायला जिवावर येते. कष्ट नको असतात ना ? मग जसे केले तसे फळ पदरी पडते. ते नकोसे झाले. जे न मिळाले, त्यामागे मग धावणे! खरे तर देव प्रामाणिक प्रयत्नांची कदर करीत असतो. आपलाच विश्वास नसतो. मग धरसोडपणा होतो. मग जे मिळते, त्याबाबत मन विटते. ते स्वत: ला आणि देवालाही बोल लावत सुटते. तरीही देव तुमची दु:खातून मुक्तता करायला झटतच असतो. फक्त तुम्ही देवावर विश्वास ठेवा.

**– किशोर गांधी**



दहावी परिक्षेत यश मिळविणारे प्रियदर्शनी पब्लिक स्कूलचे विद्यार्थी.

# प्रियदर्शनी पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांचे दहावी परिक्षेत यश

नगर – भिंगार येथील प्रियदर्शनी पब्लिक स्कूल इयत्ता १०वी चा निकाल ९८.६३% लागला. शाळेच्या निकालाची परंपरा कायम ठेवून अनुष्का संतोष बिदे या विद्यार्थिनीने ९४.२०% गुण मिळवून प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होण्याचा मान पटकावला. तसेच गोसावी समृद्धी योगेश ९३.६०%, तरवडे देवयानी सचिन ९२.८०%, आळकुटे प्रज्वल सोमनाथ ९०.२०% आणि नगरे कशिश निलेश ८९.६०% गुण मिळवून शाळेच्या यशामध्ये मानाचा तुरा रोवला.

संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब खोमणे, कॉलेजच्या प्राचार्य श्रीमती अंजली बोधक, उपप्राचार्य अमोल घोरपडे व पर्यवेक्षक कु.अनिता थापा आणि शिक्षकांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# आठरे पाटील पब्लिक स्कूलच्या १०० टक्के निकालाची उज्ज्वल परंपरा कायम

नगर – पुणे विभागीय शिक्षण मंडळातर्फे इयत्ता १० वी (एस.एस.सी) फेब्रुवारी / मार्च – २०२६ या बोर्ड परीक्षेत अ. नगरच्या सावेडी विभागातील वडगांव गुप्ता रोड वरील आठरे पाटील पब्लिक स्कूल या इंग्रजी माध्यमाच्या वसतिगृहात्मक शाळेच्या विद्यार्थ्यांनी राज्यात सर्वोत्कृष्ट १००% उज्ज्वल निकालाची परंपरा यावर्षीही कायम राखली.



कु. ससे वेदिका विक्रम कु. कानवडे धनश्री अनिल चंद भानुदास पंढरीनाथ

शाळेच्या एकूण ८७ प्रविष्ठ विद्यार्थ्यांपैकी ४३ (४९.४२%) विद्यार्थी विशेष श्रेणीत तर ३४ (३९.०८%) विद्यार्थी प्रथम श्रेणीत तर द्वितीय श्रेणीत १० (११.५०%) विद्यार्थी उत्तीर्ण झाले. एकूण ८७ प्रविष्ठ विद्यार्थ्यांपैकी १८ विद्यार्थ्यांनी ८५ टक्क्यांपेक्षाही अधिक गुण प्राप्त केले.

शाळेची विद्यार्थिनी कु. ससे वेदिका विक्रम ९६.६०% गुण मिळवून प्रथम, कु. कानवडे धनश्री अनिल ९५.००% गुण मिळवून व्दितीय, तर शाळेचा विद्यार्थी चि. चंद भानुदास पंढरीनाथ या विद्यार्थ्याने ९४.४०% गुण प्राप्त करून तृतीय क्रमांक मिळविला.

शाळेच्या आतापर्यंत एकूण ३७ बॅचेसमध्ये उत्तीर्ण झालेले विद्यार्थी असे एकूण ३२९६ विद्यार्थ्यांपैकी १५२२ (४६.१७%) विद्यार्थी विशेष श्रेणीत, १३०३ (३९.५३%) विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झालेले आहेत. तर ३८० (१२.५२%) विद्यार्थी व्दितीय श्रेणीत उत्तीर्ण झालेले आहेत.

सदर आकडेवारीवरून महाराष्ट्र स्टेट बोर्डच्या पॅटर्नमध्ये निकालात वर्चस्व राखणारी एकमेव आदर्श शाळा आहे. नर्सरी ते दहावीपर्यंतच्या या निवासी व अनिवासी मुला–मुलींच्या वसतिगृहात्मक, शैक्षणिक सुविधांनी परिपूर्ण अशा इंग्रजी माध्यमाच्या शाळेत विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेची रुची वाढावी या करीता इ. ४ थी, इ. ५ वी, इ. ७ वी व इ. ८ वी साठी शिष्यवृत्ती परीक्षा, शासकीय चित्रकला परीक्षा, हिंदी राष्ट्रभाषा बहिस्थः परीक्षा, गणित, विज्ञान, संगणक, ऑलम्पियाड परीक्षा, एम.टी.एस., एन. टी. एस. इ. स्पर्धा परीक्षांचे ही आयोजन केले जाते.

१३ जुलै, १९८७ रोजी स्थापन झालेल्या या शाळेस सर्वोत्कृष्ट निकालाची ३७ वर्षाची वैभवशाली परंपरा लाभलेली आहे. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकास होण्यासाठी शालेय अभ्यासाबरोबरच २५ प्रकारचे देशी व विदेशी क्रीडा प्रकारांचेही प्रशिक्षण दिले जाते.

उज्ज्वल यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचे संस्थेच्या सन्माननीय अध्यक्षा डॉ. अंजली आठरे पाटील, कार्यकारी विश्वस्त डॉ. अनिल आठरे पाटील, सर्व विश्वस्त, मुख्याध्यापक, समन्वयक, प्राथमिक विभागप्रमुख, पर्यवेक्षिका व सर्व शिक्षक–शिक्षकेतर कर्मचारी, पालक व विद्यार्थी यांनी अभिनंदन केले.

# परिस्थिती शिक्षणाची जिद्द असलेल्यांना थांबवू शकत नाही : डॉ. पारस कोठारी

नगर – परिस्थिती माणसाला थांबवू शकत नाही, हे इयत्ता १० वी, १२ वी मधील विद्यार्थिनींनी प्रथम तीन गुणानुक्रम मिळवून सिद्ध करून दाखविले आहे. शिक्षणासाठी असलेली त्यांची तळमळ आणि मेहनत प्रेरणादायी आहे, असे प्रतिपादन डॉ. पारस कोठारी यांनी केले. रात्रशाळा ही केवळ शिक्षण देणारी संस्था नसून अनेक विद्यार्थ्यांसाठी नव्याने आयुष्य घडविण्याची संधी आहे. विद्यार्थ्यांनी आत्मविश्वास आणि चिकाटीच्या बळावर यश मिळविले असून, भविष्यातही ते विविध क्षेत्रात नावलौकिक मिळवतील, असा विश्वास वाटत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.



हिंद सेवा मंडळाच्या भाई सथ्था नाईट हायस्कूल व ज्युनिअर कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी एसएससी (इयत्ता १० वी) व एचएससी (इयत्ता १२ वी) बोर्ड परीक्षेत यश मिळविल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला.

## भाई सथ्था नाईट हायस्कूलच्या विद्यार्थ्यांची बोर्ड परीक्षेत कामगिरी

आर्थिक, सामाजिक तसेच कौटुंबिक अडचणींवर मात करत शिक्षणाची जिद्द कायम ठेवणाऱ्या विद्यार्थ्यांनी रात्र शाळेत शिक्षण घेऊन पुन्हा एकदा यशाचे शिखर गाठले आहे. दिवसभर काम करून रात्री शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी १० वी व १२ वी बोर्डाच्या परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत संघर्षातून यशाची प्रेरणादायी कहाणी निर्माण केली.

हिंद सेवा मंडळाच्या भाई सथ्था नाईट हायस्कूल व ज्युनिअर कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी एसएससी (इयत्ता १० वी) व एचएससी (इयत्ता १२ वी) बोर्ड परीक्षेत घवघवीत यश मिळविले. काहींनी कंपनीत व विविध ठिकाणी दिवसा काम करुन रात्री शिक्षण घेतले. कार्यक्रम प्रसंगी रात्रशाळेत प्रवेशित होऊन इयत्ता १२ वीतील अनिशा आल्हाट, प्रिया आल्हाट, स्वाती अल्हाट या तिघी सख्या बहिणी, सुनीता लक्षेटी –ममता लक्षेटी या बहिणी, सोनाली शिंदे व पूजा शिंदे या जावा जावा व योगेश शिंदे व सोनाली शिंदे पती–पत्नी, दिपाली बनकर– राज बनकर आई –मुलगा, इयत्ता दहावीतील नवरा– बायको विजय लोंढे व निर्मला भालेराव यांनी यश संपादन केल्याबद्दल व रात्रशाळेत प्रवेशित आई सोबतच अभ्यास करणारे आई–मुलगा रुकसार शेख–अब्दुल शेख, पल्लवी गायकवाड–श्रेयस आई–मुलगी, स्वाती गडाख–ऋतुजा देखील एकत्र परीक्षा देऊन उत्तीर्ण झाले.

या गुणवंत विद्यार्थ्यांचा संस्थेच्या वतीने गौरव सोहळा आयोजित करण्यात आला होता.

कार्यक्रमात नाईट हायस्कूलच्या माजी चेअरमन प्रा. ज्योतीताई कुलकर्णी तसेच नाईट हायस्कूलचे विद्यमान चेअरमन डॉ. पारस कोठारी यांच्या हस्ते विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी रात्रशाळेचे प्राचार्य सुनिल सुसरे, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

इयत्ता १० वीच्या परीक्षेत विद्यालयाचा निकाल ७६ टक्के लागला. यामध्ये प्रथम : रेश्मा संपतलाल गांधी६९.८०%, द्वितीय : अलीस जॉन डिसोजा ६९.४०%, तृतीय : रेखा अशोक गायकवाड६६.४०% या विद्यार्थ्यांनी प्रतिकूल परिस्थितीतही सातत्यपूर्ण अभ्यास करत उल्लेखनीय यश मिळविले.

इयत्ता १२ वी कला शाखेचा निकाल ६५.९० टक्के लागला. यामध्येप्रथम : रूपाली मेघना बिल्ला६३%, द्वितीय : अनिशा राजेंद्र अल्लाट५८.५०%, तृतीय : प्रिती बाळू कांबळे५५.६७%.

वाणिज्य शाखेचा निकाल ३० टक्के लागला. यामध्ये प्रथम : अश्विनी दिलीप गुंजाळ ५६%, द्वितीय : अंजली संजय नांगरे ५०%, तृतीय : वैष्णवी दत्तात्रय जोशी ४८% व तृप्ती नंदकुमार गाडे ४८% या यशस्वी विद्यार्थ्यांनी आपल्या मेहनतीच्या जोरावर विद्यालयाचा गौरव वाढविला.

प्रा. ज्योतीताई कुलकर्णी म्हणाल्या की, रात्रशाळेत शिक्षण घेणारे विद्यार्थी हे खऱ्या अर्थाने जिद्दीचे प्रतीक आहेत. अनेक विद्यार्थी दिवसभर नोकरी, व्यवसाय किंवा कौटुंबिक जबाबदाऱ्या सांभाळून रात्री शिक्षण घेतात. अशा परिस्थितीत त्यांनी मिळविलेले यश हे अत्यंत कौतुकास्पद आहे. शिक्षणामुळेच जीवनाला नवी दिशा मिळते. या विद्यार्थ्यांनी समाजासमोर आदर्श निर्माण केला असून, त्यांच्या यशामुळे इतर विद्यार्थ्यांनाही प्रेरणा मिळेल. संस्थेच्या माध्यमातून अशा विद्यार्थ्यांना सर्वतोपरी सहकार्य केले जात असल्याचे त्यांनी सांगितले.

प्राचार्य सुनील सुसरे यांनी रात्रशाळेतील विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देणाऱ्या तसेच विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी रविवारी जादा तासाचे आयोजन करणे असे विविध प्रकारचे सहकार्य करणाऱ्या मासूम संस्थेच्या संचालिका निकिता केतकर, डायरेक्टर कमलाकर माने, युवराज बोऱ्हाडे, एसएससी प्रमुख शशिकांत गवस, गुरुप्रसाद पाटील, संदीप शेलार, निलेश ठोंबरे, संदीप सूर्यवंशी व सर्व टीम तसेच रोटरी क्लबच्या डॉ. बिंदू शिरसाठ यांनी रोटरी क्लबमार्फत विद्यार्थ्यांना आयडियल स्टडी अॅप दिल्याने विद्यार्थ्यांना यश प्राप्त करण्यास मदत झाली त्याबद्दल त्यांचे आभार मानले. यशस्वी विद्यार्थी–विद्यार्थिनी तसेच शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे संस्थेचे अध्यक्ष प्रा. शिरीष मोडक, कार्याध्यक्ष सुमतीलाल कोठारी, मानद सचिव संजय जोशी, माजी कार्याध्यक्ष डॉ. रमेश झरकर, अनंत फडणीस, ज्येष्ठ मार्गदर्शक ब्रिजलाल सारडा, अजित बोरा, कार्यकारिणी सदस्य व शालेय समिती सदस्यांनी अभिनंदन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महादेव राऊत यांनी केले. बाळू गोरडे यांनी आभार मानले.



भैरवनाथ एज्युकेशन सोसायटी संचलित रेणुका माता प्राथमिक विद्यालयाचे स्पर्धा परीक्षांतील यशस्वी विद्यार्थी शिक्षकांसमवेत.

### भैरवनाथ एज्युकेशन सोसायटी संचलित

# रेणुका माता विद्यालयाच्या विद्यार्थ्यांची स्पर्धा परीक्षांमध्ये बाजी

नगर – भैरवनाथ एज्युकेशन सोसायटी संचलित रेणुका माता प्राथमिक विद्यालयाचे याही वर्षी स्पर्धा परीक्षांमध्ये विद्यार्थ्यांनी मारली बाजी व स्पर्धा परीक्षेत येणाऱ्या यादीत परंपरा कायम राखली आहे. रेणुका माता प्राथमिक विद्यालय केडगाव या शाळेमध्ये दरवर्षी मंथन स्पर्धा परीक्षा, स्टुडंट टॅलेंट सर्च परीक्षा, प्रज्ञाशोध परीक्षा व इयत्ता चौथी महाराष्ट्र शासन शिष्यवृत्ती परीक्षेला दरवर्षी इयत्ता पहिली ते चौथीपर्यंत शाळेतील विद्यार्थी बसवले जातात. व दरवर्षी शाळेतील गुणवान विद्यार्थी राज्यस्तर, जिल्हास्तर तालुकास्तर व केंद्र स्तरावर विद्यार्थ्यांचे नंबर येतात. वर्षभर सर्व शिक्षक विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून जादा तासाचे आयोजन करतात. रेणुका माता प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक नरवडे सर, संस्थेचे संस्थापक, अध्यक्ष भानुदास कोतकर, संस्थेचे सचिव सचिन कोतकर, जेष्ठ संचालक रघुनाथ लोंढे, भाग्योदय माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य ज्ञानदेव बेरड या सर्वांचे मार्गदर्शन आम्हाला लाभत असते व नुकत्याच १ मे या कार्यक्रमानिमित्त सर्व गुणवंत विद्यार्थ्यांना सन्मानपत्र वाटप करण्यात आले.

विविध स्पर्धा परीक्षेमध्ये विद्यार्थ्यांना लहानपणापासून स्पर्धा परीक्षेची गोडी निर्माण व्हावी तसेच विद्यार्थ्यांना भविष्यामध्ये विविध स्पर्धा परीक्षेमध्ये भीती कमी व्हावी या हेतूने संस्थेचे मार्गदर्शक संस्थापक भानुदास कोतकर यांचे वेळोवेळी मार्गदर्शन लाभते.

गुणवंत विद्यार्थी चांगल्या गुणाने पास होतात. शाळेचे व पालकांचे नावलौकिक करतात. स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन करणारे शिक्षक श्रीमती कोरडे मॅडम, श्रीमती केरूळकर पद्मा, शिंदे संजय, श्रीमती कारले मॅडम यांनी वर्षभर जादा तास घेऊन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. व पालकांचे देखील चांगल्या प्रकारे सहकार्य लाभले.

# सारसनगरच्या विधाते विद्यालयाचे दहावीच्या बोर्ड परीक्षेमध्ये यश

## शाळेचा ९२ टक्के निकाल; ६ विद्यार्थी विशेष प्राविण्यसह उत्तीर्ण



संतोष नाणेकर अजित इंगवले सिद्धार्थ घुले

नगर – सारसनगर येथील कै. दामोदर विधाते मास्तर माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी इयत्ता दहावी बोर्ड परीक्षेत घवघवीत यश संपादन केले. शाळेचा निकाल ९२ टक्के लागला आहे. ६ विद्यार्थी विशेष प्राविण्यसह व १६ विद्यार्थी प्रथम श्रेणीत श्रेणीत उत्तीर्ण झाले.

विद्यालयातील गुणवंत विद्यार्थ्यांमध्ये संतोष गणेश नाणेकर ८३% मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. अजित विजय इंगवले ८२.४०% मिळवत द्वितीय, तर सिद्धार्थ राजेंद्र घुले ८९.२०% मिळवत तृतीय क्रमांक मिळविला. रोशनी अरुण गोपाळघरे ७८% चौथा क्रमांक प्राप्त केला.

या यशाबद्दल संस्थेचे विश्वस्त बाळासाहेब (अण्णा) विधाते, रामदास कानडे संस्था सरचिटणीस प्राध्यापक शिवाजीराव विधाते माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक संतोष सुसे, प्राथ विद्यालयाचे मुख्याध्यापक शिवाजीराव म्हस्के व सर्व शिक्षक वृंद यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

दहावीच्या विद्यार्थ्यांना सारिका गायकवाड, अमोल मेहेत्रे, सचिन बर्डे या शिक्षकांनी मार्गदर्शन केले.

# भैरवनाथ एज्युकेशन सोसायटी - शिक्षण क्षेत्रातील एक वटवृक्ष



संस्थापक - मा. भानुदासजी कोतकर साहेब

केडगाव : रेणुकामातेच्या पदस्पर्शाने पावन झालेली भूमी आणि अहिल्यानगर महानगरपालिकेतील केडगाव हे एक महत्त्वाचे उपनगर! हेच उपनगर आज शिक्षणाच्या बाबतीत प्रगतीच्या शिखरावर आहे. ३० वर्षांपूर्वी केडगावमधील विद्यार्थ्यांना शिक्षण घेण्यासाठी अनंत अडचणी येत होत्या. शिक्षणासाठी एक तर नगरला जावे लागे किंवा अर्ध्यातच शिक्षण सोडावे लागे. विद्यार्थ्यांची होणारी ही गैरसोय लक्षात घेऊन मा. भानुदासजी कोतकर साहेबांनी पंचायत समितीचे सभापती असताना ओळखली आणि केडगावमधील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची सोय कशी करता येईल याचा साहेबांनी ध्यास घेतला. याच ध्यासातून गोरगरीब मुलांच्या शिक्षणाच्या सोयीसाठी भैरवनाथ एज्युकेशन सोसायटी हा वटवृक्ष साहेबांनी लावला व संस्थेच्या माध्यमातून आजपर्यंत हजारो विद्यार्थी घडविण्याचे काम केलेले आहे. अनेक पोलिस अधिकारी, निबंधक, स्पर्धा परीक्षाच्या माध्यमातून अधिकारी, एमबीबीएस, क्लासवन ऑफीसर व इतर क्षेत्रातही यशस्वी काम करणारे विद्यार्थी संस्थेने घडविले आहेत.



अध्यक्षा - सौ. सुरेखाताई भानुदासजी कोतकर

याच दरम्यान त्यांचा स्व. अशोकभाऊ फिरोदिया यांच्याशी संपर्क आला. अनेक वेळा केडगावमधील मुलांना भाऊसाहेब फिरोदिया या शाळेत प्रवेश मिळावा यासाठी साहेब स्व. फिरोदिया साहेबांशी बोलायचे. कोतकर साहेबांनी सन १९९४मध्ये ''भैरवनाथ एज्युकेशन सोसायटी''ची स्थापना केली. ''स्वर्गीय अशोकभाऊ फिरोदिया यांच्या प्रेरणेने मला शिक्षण संस्था उभारण्याची ऊर्जा मिळाली'' तसेच संस्थेतील शाळांच्या अनुदानासंबंधी माजी मुख्यमंत्री स्व. विलासराव देशमुख यांचे मोलाचे सहकार्य मिळाले, असे मा. भानुदासजी कोतकर साहेब अनेकदा कृतज्ञतापूर्वक सांगतात.

समाजासाठी काहीतरी भरीव कार्य करण्याची प्रेरणा आणि शिक्षण क्षेत्रात ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी संधी निर्माण करण्याची जिद्द त्यांना निर्माण झाली. त्या प्रेरणेतूनच त्यांनी शिक्षणसेवेचा ध्यास घेत भैरवनाथ एज्युकेशन सोसायटीची पायाभरणी केली. आज ही संस्था हजारो विद्यार्थ्यांच्या आयुष्याला दिशा देत असून ग्रामीण भागातील शिक्षण चळवळीचे सक्षम केंद्र म्हणून ओळखली जात आहे. माननीय भानुदासजी कोतकर साहेब यांच्या तळमळीमुळे भैरवनाथ एज्युकेशन सोसायटीच्या माध्यमातून शिक्षण क्षेत्रातील एक वटवृक्ष उभा राहिला आहे. आज संस्थेच्या सर्व शाळांसाठी स्वतःच्या मालकीच्या भव्यदिव्य सुसज्ज इमारती उभ्या आहेत. या संस्थेच्या माध्यमातून चालविल्या जात असलेल्या विविध शाळांमधील विद्यार्थ्यांनी आज शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि क्रीडा क्षेत्रात जिल्हा, विभाग आणि अगदी राज्य स्तरापर्यंत यशस्वी भरारी घेतली आहे. केडगाव देवी आणि परिसरातील ग्रामीण भाग आज शिक्षणाच्या प्रवाहात सक्षमपणे उभा राहताना दिसत आहे. या परिवर्तनामागे ज्यांनी आयुष्यभर समाजासाठी झटत शिक्षणाचे दीप प्रज्वलित ठेवले, ते म्हणजे माननीय भानुदासजी कोतकर साहेब. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत, कोणत्याही मोठ्या आर्थिक पाठबळाशिवाय, समाजासाठी असलेली तळमळ आणि सर्वसामान्यांच्या मुलांना शिक्षण मिळाले पाहिजे, हा ध्यास घेऊन त्यांनी सुरू केलेली शिक्षणसेवा आज विशाल वटवृक्षात परिवर्तित झाली आहे.

एक काळ असा होता की, ग्रामीण भागातील अनेक विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहत होते. आर्थिक अडचणी, शैक्षणिक सुविधा नसणे आणि जागृतीचा अभाव यामुळे अनेक कुटुंबांतील मुले शिक्षण घेऊ शकत नव्हती. अशा परिस्थितीत माननीय भानुदासजी कोतकर साहेबांनी समाजातील गरज ओळखली आणि शिक्षणाचा दिवा प्रत्येक घरापर्यंत पोहोचविण्याचा संकल्प केला. आज अनेकजण त्यांना ''केडगावमध्ये शिक्षणाची गंगा आणणारे भगीरथ'' म्हणून गौरवाने संबोधतात.

### प्रतिकूल परिस्थितीतून उभा राहिलेला शिक्षणाचा प्रवास

संस्थेच्या सुरुवातीच्या काळात अनेक अडचणी होत्या. पायाभूत सुविधा कमी, आर्थिक अडचणी, ग्रामीण भागातील मर्यादा आणि शिक्षणाविषयी असलेली उदासीनता- या सर्व संकटांवर मात करत साहेबांनी शिक्षणाची मशाल पेटती ठेवली. त्यांच्या अथक परिश्रमातून आणि समाजहिताच्या भावनेतून भैरवनाथ एज्युकेशन सोसायटीची उभारणी झाली.

### भैरवनाथ एज्युकेशन सोसायटी अंतर्गत चालू असलेली विद्यालये

(१) भाग्योदय विद्यालय, भोयरे पठार, ता. नगर : स्थापना १९९४.
(२) भाग्योदय माध्यमिक, केडगाव देवी : स्थापना १९९४.
(३) भाग्योदय कनिष्ठ महाविद्यालय, केडगाव देवी : स्थापना २०००.
(४) जगदंबा विद्यालय, केडगाव देवी : स्थापना २०००.
(५) रेणुकामाता प्राथमिक विद्यालय, केडगाव देवी : स्थापना २०००.
(६) ओॲसिस इंग्लिश मिडियम स्कूल (सीबीएसइ स्कूल), केडगाव देवी : स्थापना २००५.

या सर्व शाळा अविरतपणे ज्ञानदानाचे पवित्र कार्य करीत आहेत व हजारो विद्यार्थ्यांचे भविष्य घडवत आहेत.

### दहावीच्या व बारावीच्या बोर्ड परीक्षेच्या निकालाची दैदिप्यमान परंपरा

प्रत्येक वर्षी संस्थेअंतर्गत कार्यरत असणाऱ्या शाळांचा १०वी व १२वी बोर्ड परीक्षांचा निकाल हा उल्लेखनीय असतो. चालू शैक्षणिक वर्षातही संस्थेच्या सर्व शाळांनी इयत्ता दहावीच्या परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. अनेक विद्यार्थ्यांनी गुणवंत यादीत स्थान मिळवत संस्थेचा नावलौकिक वाढवला आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी शहरांतील विद्यार्थ्यांशी स्पर्धा करत मिळविलेले हे यश विशेष कौतुकास्पद मानले जात आहे.

या यशामागे संस्थेची शिस्तबद्ध शैक्षणिक पद्धत, शिक्षकांची मेहनत आणि विद्यार्थ्यांसाठी घेतलेले विशेष उपक्रम कारणीभूत ठरले आहेत.

संस्थेच्या सर्व शाखांमध्ये विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम राबविले जात आहेत. विद्यार्थ्यांसाठी नियमित अध्यापनासोबतच जादा तास, सुट्टीतील विशेष वर्ग, सराव परीक्षा, वैयक्तिक मार्गदर्शन, गुणवंत विद्यार्थ्यांसाठी विशेष प्रशिक्षण, दुर्बल विद्यार्थ्यांसाठी पुनरावृत्ती सत्र, सतत प्रोत्साहन व पालक संवाद असे अनेक उपक्रम राबविण्यात आले.

### ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी विशेष प्रयत्न

माननीय भानुदासजी कोतकर साहेब यांची नेहमीच धारणा राहिली आहे की, ''ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये क्षमता कमी नसते, संधी कमी असतात.'' हीच भूमिका डोळ्यांसमोर ठेवून संस्थेमार्फत ग्रामीण विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, इंग्रजी संभाषण, विज्ञान-गणित प्रशिक्षण आणि आधुनिक शिक्षण पद्धती उपलब्ध करून देण्यात आल्या.

शिक्षक आणि मुख्याध्यापकांनी विद्यार्थ्यांच्या यशासाठी प्रचंड मेहनत घेतली. विद्यार्थ्यांच्या शंका निरसनासाठी अतिरिक्त वेळ देणे, अभ्यासाची सतत तपासणी, घरभेटी आणि पालकांशी संवाद यामुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण झाला.

### शासकीय व राष्ट्रीय पुरस्कारांनी गौरवलेली संस्था

संस्थेच्या शाळांनी केवळ परीक्षेतील निकालातच नव्हे तर विविध शासकीय व राष्ट्रीय स्तरावरील उपक्रमांमध्येही उल्लेखनीय यश मिळविले आहे. दरवर्षी संस्थेतील विविध शाळा राज्य आणि राष्ट्रीय स्तरावरील विविध उपक्रमांमध्ये सहभागी होतात व त्यात या शाळांचा सन्मानही झालेला आहे. भाग्योदय विद्यालयास महाराष्ट्र शासनाचा ''मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा'' उपक्रमात तालुकास्तरीय पुरस्कार प्राप्त झाला आहे. केंद्र शासन पुरस्कृत ''स्वच्छ विद्यालय पुरस्कारा''मध्ये ५ स्टार मानांकन मिळाले आहे. आंतरजिल्हा परिषद आयोजित गुणवत्ता वाढ विकास विभागीय पारितोषिक तसेच महेश मुनोत मेरीट फाऊंडेशनचा ''स्वच्छ सुंदर शाळा पुरस्कार'', ''जिल्हा परिषद सुंदर शाळा पुरस्कार'' मिळाले आहेत.

संस्थेने विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला नेहमीच प्राधान्य दिले आहे. शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांमध्ये कला, क्रीडा व नेतृत्वगुण विकसित व्हावेत यासाठी विविध उपक्रम राबवले जातात. संस्थेचे विद्यार्थी राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धांमध्ये सहभागी झाले आहेत. विविध सांस्कृतिक स्पर्धांमध्ये यश गिळवत आहेत. गुणदर्शन कार्यक्रमांतून कला सादर करत आहेत. विज्ञान प्रदर्शन आणि सामाजिक उपक्रमांमध्येही पुढाकार घेत आहेत. यामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास आणि व्यक्तिमत्त्व विकास अधिक सक्षम होत आहे.

### ''शिक्षण हेच खरे समाज परिवर्तनाचे साधन''

माननीय भानुदासजी कोतकर साहेब यांनी आयुष्यभर शिक्षणाला समाज परिवर्तनाचे प्रभावी माध्यम मानले. आर्थिकदृष्ट्या दुर्बल, शेतकरी आणि कामगार कुटुंबातील मुलांनी शिक्षण घेऊन मोठे व्हावे, समाजात सक्षमपणे उभे राहावे, ही त्यांची कायम भूमिका राहिली आहे. त्यांनी लावलेले हे शिक्षणरुपी रोपटे आज जारो विद्यार्थ्यांच्या जीवनाला दिशा देणारा विशाल वटवृक्ष बनला आहे. अनेक विद्यार्थी डॉक्टर, इंजिनिअर, शिक्षक, अधिकारी आणि विविध क्षेत्रांमध्ये यशस्वी होत संस्थेचे नाव उज्वल करीत आहेत. संस्थेच्या या उल्लेखनीय कार्याबद्दल पालक, माजी विद्यार्थी, ग्रामस्थ आणि शिक्षण क्षेत्रातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाचे दालन खुले करून सामाजिक परिवर्तन घडवून आणणाऱ्या माननीय भानुदासजी कोतकर साहेबांविषयी सर्व स्तरांतून कृतज्ञता व्यक्त केली जात आहे. आज भैरवनाथ एज्युकेशन सोसायटी ही केवळ शिक्षण संस्था नसून उपनगरातील व ग्रामीण भागातील हजारो कुटुंबांच्या आशा-आकांक्षांचे केंद्र बनली आहे. माननीय भानुदासजी कोतकर साहेब यांच्या प्रेरणेतून ही संस्था भविष्यातही शिक्षण, संस्कार आणि गुणवत्तेचा दीप तेवत ठेवेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.














